गणपुले फाऊंडेशन प्रस्तुत

# साद चित्पावनीचो

चित्पावनी त्रैमासिक, वर्ष १ | अंक – तिसरा



चित्र इंटरनेट वरून साभार

प्रकाशन दिनांक : आषाढ शु. अष्टमी | १४ जुलै २०२४

# साद चित्पावनीचो

चित्पावनी त्रैमासिक, वर्ष १ | अंक – तिसरा

संपादिका

सौ. आरती मोने

प्रमुख मार्गदर्शक

श्री. अशोक नेने

साहित्य पुनरावलोकन

श्री. वासुदेव दामले, सौ. गायत्री भुस्कुटे

सल्लागार मंडळ

श्री. सुधीर गोरे, डॉ. सौ. अनुश्री गणपुले

मुखपृष्ठ, संकलन, अक्षर जुळवणी, प्रकाशन

गणपुले फाऊंडेशन

साहित्य पाठविण्या साठी..

info@ganpulefoundation.org

व्हॉटस्यॅप: +९१ ९९२० ३४५८६१

टीप:

साहित्य पाठवीताना, टाईप करून पाठवावं. स्कॅन किव्वा pdf रूपात पाठऊ नये.

© गणपुले फाऊंडेशन.
या अंकातील मजकूर; लेखक आणि प्रकाशक यांच्या नावाशिवाय प्रसारित करू नये.

या अंकात वापरण्यात आलेली चित्रे इंटरनेट वरून घेण्यात आली आहेत. सर्व चित्रांचे कॉपी राईट मूळ लेखकांचे व संकेत स्थळांचे आहेत.
अंकात व्यक्त झालेल्या मतांशी संपादक व प्रकाशक सहमत असतीलच असे नाही.

# अनुक्रमणिका


१. संपादकीय....४
२. गणपुले फाऊंडेशन चे वतीन....६
३. काणी मोबाईल कव्हराचे अभ्यंग स्नानाची....८
४. में अणि सर्कस....१०
५. आबोली....१५
६. Essence अर्क....१६
७. आई....१८
८. फसवणूक....१९
९. मन....२१
१०. रक्षण निसर्गाचां....२२
११. आई....२५
१२. पुस्तक परिचय....२८
१३. तेड्ला में मात नसेन!....३०
१४. पत्र....३१
१५. अहो दाम्पत्य स्नेह:....३२
१६. एक आमी ऱ्हेवया....३४
१७. मन ....३५
१८. वाट....३८
१९. आकाशपाळणो....३९
२०. श्रद्धा अणि विश्वास....४१
२१. मोडी लिपी....४३
२२. ऑनलाईन....४४
२३. अनुभव....४५
२४. भूतस्य कथा रम्या....४६
२५. ससो अणि कासव ....५६



# संपादकीय

नमस्कार ... नमस्कार.... !!! 🙏🏻 रुपाला खुलवत नाय, तो दागिनो व्यर्थ, प्रतिभेची पारख नाय, तो पुरस्कार व्यर्थलोकांना शिकवीत नाय, तो अहंकार व्यर्थअणि.... मनात्थीन उगवत नाय, तो नमस्कार व्यर्थ !!

'साद चित्पानीचो' अंक तिसरो २०२४, हे अंकाचे प्रकाशन सोहळेचे निमित्तान सगळे ल्हान थोर, रसिक माय बाप, लेखक लेखिका, कवी कवयित्री तुमचां सगळेंचा सहर्ष स्वागत करसां. तसांच आजचे सन्माननिय अतिथी, आमचे सगळेंचे लाडके अणि आदरणीय श्री. दत्ताराम बर्वे काका हेंनाय माजो नमस्कार! "अनेक संकटाना हसत हसत झेलेची कसब, कला जेंचे नसां नसांत से; रसाळ पणसांतले गरेसारखां बोलणेंत माधुर्य से अणि आईचे मायाला सुध्दा क्षणभरी पाठल्या थेवील असां प्रेमान भरलेला काळीज से, अशी जेष्ठ व्यक्ती आज प्रकाशन सोहळेला लाभली  हे आमचा मोठां भाग्य से. आज एठा बोलताना खूप आनंद हसे की, "साद चित्पानीचो" अंक तिसरो २०२४. हे अंकासाठी लाभलेले सगळे  साहित्यिक. तेंचे/त्यांचे मनातल्यो भावभावना, लेखण्यात्थीन 'इ बुक' पर्यंत पावल्यो सत. अनुभव, संघर्ष, प्रेरणां, माया, उमेद, वास्तव, आनंद, कृपादृष्टी, भय, सुख दु:ख, प्रसंग, बोध अशी मनांतील अनेक वादळां शातं करणेची ताकद सलेलां साहित्य, जणू सगळांच एकमेकांचे हातात हात घाल्नी, साहित्याचे दालनात ज्ञानाचो प्रसाद घेव्नी उभी सत. असो विविधांगान सजलेलो वाचनीय  'साद चित्पावनीचो ' अंक, तुमचे आमचे विचाराना नवी प्रेरणां देव्वे सज्ज से. तुमचे सगळेंचे सहकार्यान तो घरांघरांत पावेल अशी खात्री से.

प्रत्येक साहित्यकांची एक इच्छा ससे की आपली लेखणी सगळेंपर्यत पावेवी, प्रकाशीत हैय्वी. असे स्वप्नांची पाखां तुटोनीं जांव नये, तसांच नवोदित साहित्यिकांना नवे उमेदीन उंच भरारी घेव्वे मिळेवी हेचेसाठी आमचे प्रतिभावंत ( 'क्रिएटिव्ह'  ) समुहांन एकजुटीन एतांचे क्षणापर्यंतचा काम पूर्ण केलेलां से, हेंचा एकमेव कारण , "प्रेमळपणांन आम्ला साथ देनांरे आमचे  सगळे साहित्यिक" अणि तेंचे बरोबरचो सुसंवाद हेचां गणित बरां जमलां से. जणू गुणांची कुंडली बरी जमलेली से, असां म्हटलां जाले  हेंत गैर कायच नाय.

# .... संपादकीय

एक गोष्ट एठा सांगेन दिस्से, जेड्ला लेखकांचे लेखण्यात्थीन साहित्य तयार हसे तेड्ला तेंचे मनांत सुद्धा नस्से की हे आपलां साहित्य सहजपणांन चार चौघांचे वाचनांत येल. कारां तरी प्रकाशित हयेल. पण एखादे आयोजकांची जोड गावसे  तेड्ला खरे अर्थान ते साहित्यिकांचे श्रमाचा सार्थक हसे, खरां फळ मिळसे हे मात्र खरां. कारण एखादेचां उत्कृष्ट लिखाण सौव्नी सुद्धा बारीकसारीक अडचणी मुळां पाठी उरसे. म्हणीच ही संधी देव्वेचा काम 'आयोजक' अर्थातच "गणपुले फाऊंडेशनचे सहकार्यान जालेलां से. अणि हे अवघड/कठीण काम बरे तरांन हैय्वा हेचेसाठी 'उत्तम प्रकाशकाची' भूमिका तितकीच महत्त्वाची ससे. अणि ती जबाबदारी आयोजकांनी बरे पैकी पुढां न्हेली से.ज्ञानाची वात, अज्ञानाला दूर करसे, आत्मज्ञान जागृत करनीं, पुण्याचा काम करसे.म्हणीच ही "अंकाचे रुपांतली' ज्ञान ज्योत' तेवत न्हेली से.

चित्पावनी बोलीचो ऱ्हास हंव नये हेची जाणकारांनी जाणीव करनीं दिली. तेच बरोबर सगळेंना साद घालेचां काम तेंचेनी केलां. अणि ते 'सादाला ओ देव्वेचां काम' दर साहित्यिकांनी केलां अणि वाचकांपर्यंत पाववेचां, अंकाचो डोल्लारो उभारेचां कार्य पूर्ण हय पर्यंत जेचो जेचो हातभार मिळ्ळो से ते सगळेंची कामगिरी खरीच कौतुकास्पद से.

"चित्पावनी साहित्य अंकाची निर्मिती" हंव्नी प्रत्येक अंक वाचक, रसिकांचे घराघरांत पाववेचां आयोजन अनेकांचे सातत्यांमुळां पूर्ण जालेलो से. अंकाची निर्मिती हो खूप आनंदाचो क्षण; हे खरां सेच पण एकाचवेळा अनेक आव्हानात्मक गोष्टींना तोंड देव्वां लागसे. बुद्धीचो अणि मनाचो कस लागसे. बिनचूक अणि गुणवत्ता राखीत सतानां वेळाशी स्पर्धा करीत पुढां जायवेचां पडसे. अनेकांचे विचारा बरोबर समरस हंव्नी काम करीत करीत तेंचे गुणांचो गुणाकार कसो हयेल हे बी बघेवां लागसे. तणावमुक्त ऱ्हेव्नी शांत अणि हासत ऱ्हेवप जमवेचा पडसे. अचानक आयलेले प्रसंगात्थीन सकारात्मक दृष्टीकोन मनांत घेत 'नवेन नवे वाटांन' सक्रीय ऱ्हेवप हेंच आमचां कार्य से. "पिढ्यानपिढ्यो कर्तृत्वाचां अणि चित्पावनीचां 'बी' रुजेवां, घराघरांत शिक्षक तयार हैय्वे अणि एक दिवस असो सैय्वो की ही प्रेरणां घेव्नीं मनामनांत 'चित्पावनी बोलीचो' वटवृक्ष हैय्वो.

अणि हे चित्पावनीचे विकासाचे  मंगल कार्याला, बाकीचेंकडा पाववे पर्यंत तुमचे सारखे, हजार जणांचो सहभाग, सहकार्य  लागनांर से. आमी सगळी मिळोनीं  हे स्वप्न प्रत्यक्षात हाडणेसाठी मनापाश्णी कार्यरत ऱ्हेवया.  तुमी सा नीं तयार ?

चला ते, "चित्पावनी बोली" चो संभाळ करुया, त्याचो प्रचार - प्रसार करीत संवर्धन करुया!".

असां म्हणसत की..... स्वतः साठी जरी कितां करे मिळ्ळा नाय जाले बाकीचेंसाठी जगोनीं बघेवां,दुसरेंचे दोळेंतलां पाणी पुसताना, तेंत आपलांच प्रतिरूप बघेवां.

तंत्र अणि साहित्य, मेळ घाल्नी दोघांचो |
सरावान तेंचे, चित्पावनी घडेल उद्याचो ||

संपादिका ✍️ 🌿

सौ. आरती मोने

# गणपुले फाऊंडेशन चे वतीन

सगळे साहित्यिकांचा अभिनंदन अणि संपादक मंडळाचे आभार. गणपुले फाऊंडेशन चे वतीन जे चित्पावनी बोली बद्दल उपक्रम केले जासत तेत साद चित्पावनीचो हे अंकाचा खूप महत्व से. चित्पावनी मध्यां साहित्य निर्मिती अणि चित्पावनी शिकणारेना एक व्यासपीठ असा हे अंकाचा महत्व से. केंचाय काम सुरू करणां खूप सोपा ससे पण तां काम सातत्यान करणां कठीण से. अंकाचा काम सातत्यान घडत से तेत साहित्यिक, मार्गदर्शक, संपादक मंडळ, सल्लागार मंडळ अणि तुमी वाचक हेंचा खूप मोठा योगदान से.

२७ जुलै २०२४ हे दिवसा गणपुले फाऊंडेशन चो वर्धापन दिन से. ते निमतान गत वर्खाचो आढावो एठा देसा.

समाजाचे उद्धारा साठी अणि संक्रूतीचे जतना साठी गणपुले फाऊंडेशन ची स्थापना केली. चित्पावनी भाषाची तोंडओळख अशी ऑनलाईन कार्यशाळा नोव्हेंबेर २०२३ मध्या आयोजित केली सली. चित्पावनी संवर्धन करणे साठी ह्या कार्यशाळाचा आयोजन केला गेला. ह्या कार्यशाळात, ४० ते ४५ विद्यार्थ्यांनी भाग घेतलेलो अणि जवळ जवळ ५०५ चित्पावनी शब्दांचो अभ्यास केलो. गोवा, महाराष्ट्र अणि परदेशात्थिन हे कार्यशाळात लोकांनी भाग घेतलो.

एक आठवडेच्या ह्या कार्यशाळात प्रश्नमंजुषा, चित्पावनी बोलताना एक मिनिटाचो व्हीडिओ करणा अशा वेगवेगळ्या पद्धतीन चित्पावनी शिकणेसाठी सगळेना प्रोत्साहन दिला गेला. सगळे स्पर्धकांना चित्पावनी पुस्तका भेट दिली गेली.

ते संगळेंना चित्पावनी साहित्य निर्मिती करणे साठी हे अंकाची सुरुवात केली.

माला अभिमान से की शिक्षक वर्गाचे मार्गदर्शनामुळां चित्पावनी हो विषय साता समुद्रा पार गेलो. हो तिसरो अंक तुमचे हातात देताना माला खूप आनंद होत से.

बोली भाषा खूप वर्खा जीवंत ठेवेची सेल तर ल्हान भुरगेना आपल्या बोली भाषाची ओढ लागणां खूप महत्वाचा से. ते मुळा, शिक्षक वर्गाचे मदतीन चित्पावनी बाल वर्गाचा आयोजन केला से. हो वर्ग ६ ते १२ वर्खाचे भुर्गेसाठी आयोजित केलो  से. ऑगस्ट महिनेपाश्णी हे वर्गाची सुरुवात हनार से. तुमचे घरात किव्वा ओळखीत जर कोणी ल्हान भुर्गी सत जालेवर,  हे बाल वर्गात नक्की घाला.

हो बाल वर्ग म्हणजे खेळ, काण्यो, चित्रा, गाणी हे मार्फत ल्हान भुर्गेना चित्पावनी बोली भाषा शिकवेचो प्रयत्न शिक्षक करणार सत. भुरगेंना बोली भाषेची गोडी निर्माण जाली तर येणारी १०० वर्खा आपली बोली भाषा कोण विसरेचो नाय. हे उपक्रमात आम्ला तुमची साथ लाभणार हेत माला तीळ मात्र शंका नाय.

# गणपुले फाऊंडेशन चे वतीन

चित्पावन तरुण अणि तरुणी हेंचा एकत्रीकरण केला तर आपली संक्रूती तेनां समजावणा सोपा जाएल हो हेतु नजरापुढा थेवनी चित्पावन यूथ फोरम हे विषयावर सुद्धा गणपुले फाऊंडेशन काम करणार से. शिक्षणा बद्दल मार्गदर्शन, नोकरी शोधे साठी मार्गदर्शन असे अनेक उद्देश घेव्नी यूथ फोरम पुढा वाटचाल करणार से. जे समाजाची ल्हान भुरगी अणि तरुण सक्षम सतील ते समाजाचा कोण कायच वाकडा करू शकत नाय. म्हणी बाल वर्ग, संस्कार वर्ग, यूथ फोरम अश्यो गजाली गणपुले फाऊंडेशन करत ऱ्हेनार से.

हे वर्खाचो दिवाळी विशेष चित्पावनी अंक छापिल रूपात प्रकाशित करेचो मानस से. तुमचे सगळेंचे मदती शिवाय दिवाळी अंक यशस्वी हैवेचो नाय. माला खात्री से की आज पर्यन्त जसा प्रेम अणि मार्गदर्शन सगळेंनी हे अंकासाठी केला तसाच चालू ऱ्हेनार. दिवाळी अंकाचा साहित्य लीव्हेसाठी एत्ता पाश्णी सुरुवात करा अणि दिवाळी विशेष अंक यशस्वी करा.

परत एकदा सगळेंचा अभिनंदन अणि आभार !

वैभव गणपुले
संयोजक - गणपुले फाऊंडेशन

# काणी मोबाईल कव्हराचे अभ्यंग स्नानाची



माजी काल हसोनी हसोनी अगदी  पुरेवाट जाली.
कितेला तां सांगसा.

आज तेचे मुळां, माला माजे मोबाईल फोनाचा कव्हर होळेची पाळी आयली. तुमी हे असां कयीच आईकलेला नसेल.

कालच में सात आठ दिवसांनी गोवेत जावनी परत घरा आयल्यां.
तेमुळां बरीचशी कामां करेची उरलेली. में एक तेलाची भरलेली पिशवी बाटल्यात ओत्नी थेवया म्हणी जेव्वेचे मेजावर काढनीं थेयलेली.

माजे घोवाला दिसलां, बायलाला मदत करुया.
तेनी आदि सगळो सरंजाम केलोन अणि पिशव्यातला तेल बाटल्यात ओते घेतला.
तकल्यावर पंखो चालूच थेव्वो लागसे, ते शिवाय हे उकाडे पुढां काय तरणोपाय नस्से.
पंखेचे वारेन प्लास्टिकची बाटली झेमले सारखी हालत सली. हो आपलो कातरलेली पिशवी घेवनी तेल ओते गेलो जाले, हे रमथाण झाला तेलाचा.

मेजावर तेल, कितांच सापसारलेला नसले मुळां, हेगडा तेगडा सगळे कडा आपल्यो, तेलांन माखलेल्यो वस्तू.

माजो मोबाईल मेजावर सले मुळां तो सगळो तेलांन न्हालेलो.

# .... काणी मोबाईल कव्हराचे अभ्यंग स्नानाची

माजे नकळत, तो तेणी असो कारो तरी लिपेयले सारखो थेयलेलोन,की माला रोकडो गावोच नये.
तेनी विचार केलेलो सणार, गुपचूप फोन फुसनी थेवेचो, मोग काय माला कळेचा नाय.
माला मात् हे कितेचोच मागमूस नतलो.

तितकेंत माला एक फोन आयलो, माजी एक "होम डिलिव्हरी" येव्वेची सली, म्हणी में फोन उखले गेल्या.

घोवान, में फोनाकडा जाव नये म्हणी थोडो जोर लावनी बघितलोन - एत्ता फोन घेव नाकां म्हणी.
माला फोन कित्ताय जाले घेव्वेच हवो सलो.

ते आवाजा वेल्यान माला तो थबथबलेलो फोन गावलो खरो, अणी में फोन घेतलो, माजा कामय बी जाला. हे सगळे भितर, कसलो विचार करे वेळच नतलो. माजे घोवाला दिसलेला, में काय एता ओगी ऱ्हेव्वेच्या नाय. सारखी बोब मारणार, पण माला मात्सोय काय राग आयलो नाय.

माला तो थबथबीत मोबाईल बघनीं, तेल लायलेला बारीक भुरगां आठवला.
एतामाजा  हसां काय थांबत नतला.

में मोग खूपदा तो फोन फुसलो, पण थोडे थोडे वेळानं, सारखा तेल भायेर येतच सला कव्हरात्थीन, थांबेचा नावच नाय.

मोग मोबाईल काढलो भायेर. हेला उपाय म्हंजे कव्हर धोव्नी काढे हवा, असो विचार करनी निदोवल्या.

मोग में इतकी हसल्या, इतकी हसल्या की,
आज माजे आंगातली "सेरोटोनीन हार्मोन्स" ची पातळी निश्चितच वाढलेली सणार, हेत संशय नाय.

सौ. देवश्री गोडबोले - पुणे




खुप दिवसांनी एक गोष्ट लिवेचां मनात आयला. साधारण १९७०  साल सणार. मे पंधरा वर्खाचो सलों, तेडला वाळपयला शाळाला जात सलो. मे नवविला तर अक्का एक वर्ख पुढा. जया लहान सली ति आंबेडे जात सली. नली सातवी होवनी लग्नाचे प्रतीक्षात सली. बहुतेक नाताळाचो महिनो डिसेंबर सणार. सुट्ट्यात आम्हीं सगळी घरा सली.

सुट्टी पडेचे आधी माला समजला कि सांखळ्या एक सर्कस आईलीसे. तीन शो करसत सकाळी १० ते १,  दुपारी २ ते ५ अणि रात्रीचो शो ६ ते ९. माझे मनात कितांय करनी सर्कशीला जावेचा भरलां. पण करणार किता? अणि कोणाला सांगणार? कारण एकदा परवानगी दिली झाले किमान चार मेंबराना घेवनी जावे हवा जे करता ब्रह्मदेवाची परवानगी मिळेल पण घरथिन जमेचा नाय. शेवटी विचार करनी करनी उपाय सापडलो.

आमचेकडा हरिश्चन्द्र फटो गांवकर कायम येणारो. पण तेला हरिश्चन्द्र हे नाव तेलाच खबर नतला सगळे तेला 'हरगो' म्हणत. में हरगेला माझो बेत सविस्तर सांगलो. “आरे हरग्या या शुक्रारा सांखळे वचपाचे. सर्कस पळोवपाक. तुका वाळपय मेरेन म्हाकां घेवन सायकल मारची पडतली. त्या दिसा दादा घरा आसचो ना. या मरे?  तु तयार आसा मरे?“

हरगो हय नाय करता तयार झालो कारण मनात दादाचो भय. में खोटाच सांगला दादा, वैनिक हांवे सांगला तु भ्येव नाका.

# .... में अणि सर्कस

हरगो माझेपेक्षा दोन वर्षांनी मोठो पण जीवान धष्टपुष्ट, तर मे किडकीडीत. में दांड्याचे भितर पाय घालनी निकतिच सायकल चालवे शिकलेलो. हरगेला पाय उडोवणी जमत नतला. तो दोन मोठे गुंडे लागी हाडी अणि सिटावर बेसोनी प्याडल ढकलोनी चालवी पण तो उंच सलेकारणान पडत नतलो. टांग मारनी चालवेचा तेलाय जमत नतला. माला नक्की खबर सली जर आम्हीं सायकलिन जावनी सुखरुप घरा पावले झालें दादा कायचं म्हणेचो नाय. तेत तो हरगेला कायचं म्हणेचो नाय हे मे जाणोनि सलो कारण आमचा काम करणारेपैकी तो प्रमुख सलो.

मे दोन चार दिवस दादाचे पालत्यावर सलो म्हणजे दादा सायकल चावी के थेईसे ता सोदणी काढेचा सलां. ता लगेच समजला तो तेच्या खोल्यात रेडिओचे पाठल्यान कारितरी थेयताना मे बघलां. पण शुक्रवारपर्यंत कोणालाच सांगलां नाय कारण, चाव्याची जागा बदलणार. मलातर किताय करनी जावेचा सला.

झाला ! ठरलेप्रमाण शुक्रवारा सकाळी दादा आपले अपटूडेट कपडे करनी तयार झालो, हातात एक पास्त घेवनी गाड्याचे वेळाला बाहेर सरलो. तेचे कपडे बघनी कळत सला कि तो के जाणार से ! दिवसभर जावेचे वेगळे कपडे म्हणजे शुभ्र धवा धोतर, तेचेवर पैरण अणि  तांबडे दोरेत बांधलेले सोनेरी बटण, गॉगल अणि टोपी पिशव्यात. एकदम स्वच्छ अशी जुती. एक लांबलचक पास्त जेत खुप कागद भरलेले. असो पेहराव म्हणजे दिवसभर येवेचो नाय हे नक्की.

आंबेडेथिन गाडी पावणेआठ आठ पर्यंत सुटे. गाडी भरली का सुटली. शेवटचो पॅसेंजर तातो सलो. गाडी चुकेल म्हणी साडेसातला घर सोडेचा, बरोबर खाडिलकर गुरुजी, नायझाले यशवंतकाका असे कोणीतरी मिळत. बरोबर आम्हीं शाळाला जावेची भुरगी. ह्या बसीचां नाव सला नंदिनी. बहुतेक त्याला तेल्याची बस म्हणत.

दादा बहुतेक करनी डिचोल्या, म्हापसे नाय झालें पणज्या जाय. गाडी सुरु करेची एक पद्धत सली. क्लिनर नायझाले स्वतः ड्राइवर एक लांब सळी इंजिनात घुसवी अणि बरेच वेळा गोलाकार फिरवी, बरोच  घाम काढलेवर गाडी सुरु हय. अशी गाडी हि वाटा पन्नासकडा थांबत अकरा वाजेपर्यंत बेत्या पावे अणि मोग फेरीबोट धरनी पणजी गाठेची.

में हळूच वैनीला विचारला, “के गेलो से दादा आज" त्यांनी सुरवातीला कायचं सांगला नाय. खुप पाठल्यानं लागलेवर त्यांनी सांगलान कितेला हवां तुला ?  येणार सत संध्याकाळपर्यंत असा मोगम उत्तर दिलान. खरा म्हणजे वैनीला तो नीट सांगत नतलो, रात्रीपर्यंत पावेन घरा असा सांगोनी भायेर पडे. तेला कसली तरी सरकारी कामा अणि कोर्टाची कामा सत सली. सरकारी कामांची बरी जाण सली. सरकारी सुविधा, फायदे कसे मिळवेचे तां तो पुरेपूर जाणे सलो. आमचे वाळपयत घराकरता गृहलोन घेणारो १९६७ सालात बहुतेक पयलो मेंबर सणार.

तर सांगेचा म्हणजे माझी खात्री झाली कि दादा काय आज रात्रीपर्यंत घरा पावेचो नाय. मे हरगेला मिळोनी माझो बेत पक्को केलो. में आधी वैनीला सांगला. वैनीनं हरगेला बलावनी सगळी चवकशी केलीन अणि में हरगेला घेवनी जानांर म्हटलेवर सपशेल नकार कारण आमचो बेत त्याला असुरक्षित दिसलो.

# .... में अणि सर्कस

माझो बेत नक्की सलो, में कुरागाळात जावनी बेसलो. पेज जेवे, भाकरी खावे आयलो नाय. थोडे वेळानं अक्का समजावे आयली. में त्याला परतोन लायली. पण त्यांनी जावनी वैनीला सांगलान. हरगो बरोबर से, तेला जाणारच झालें जाव दे तुला विटोवनी सोडणार दिवसभरी.

थोडे वेळानं वैनी बलावे आयली, मे अजिबात आयकेच्या मनस्थितीत नतलो. वैनीन विचारलान, "तुला सायकलीची चावी कशी मिळणार" में सांगलं "माला खबर से !" मग त्यांनी हरगेला बलावनी हाडलोन. अणि आमी अगदी सुरक्षित जावनी येणार हेची खात्री केलीन. खरां म्हणजे उंदराला मांजराची साक्ष. हरगेला आधीच सगळां सांगोनी तयार केलेलो. शिवाय तेणी फक्त सायकल चालवेची तेला जर फुकटची सर्कस बघे मिळसे झालें कितेला नाका ?

आमची जावेची तयारी पुर्ण झाली.

संध्याकाळा पांच वराना वाळपयथिन स्पेसिअल बस जाणार सली. घराथीन होकार मिळवे पयले दोन शो चुकवेचे पडले. पण हरकत नाय जावे मिळसे हेच मोठा सला. आम्हीं साडेतीन चारला दुपारी जावे तयार झाले. में चावी सोदनी हरगेला दिली. तेणी टायर चेपनी बघले, मातशी हवा भरलीन.

आमला सर्कसकरता पांच रुपयेची गरज सली. वैनीनं भिंतीत हात घालनी बेलेतले २ रूपये दिलेन अणि नाय म्हणी सांगलान. आमी शाळाला जाणारे म्हणी अक्काकडा थोडे पैसे सले. सगळेनी आपल्यो पर्शी खाली करनी ३ रूपये जमा झालें. असा करनी जावेची तयारी पुर्ण. बसीला येते जाते मिळोनि २ रूपये, सर्कस दोघांचे २ रूपये. असा करनी १ रुपयो उरणार सलो. ते कारणान दोघय खूष.

हरगो बरोबर साडेतीनला आयलो. तो फट मारील असा ओगीच दिसे पण तो आयलो. वैनीनं आमला दोघांना खायवे दिलान. वरथीन थोडा थोडा दूध प्येवे दिलान. जाताना बरोबर एक लहानशा पिशव्यात तीन चार भाकरयो अणि चटणी दिलीन. भायेर सरताना अक्का वैनी दोघाय हरगेला सांगत सली, "सवकास चलय वाटेत पडो बिडो नाका"

में हळूच चावी हरगेला दिली. दोन तीनदा पेपारा वाजयला. पेपारा बॅटरीवर चालणारा सला, फटफट्याला ससे तसा. हरगो सायकल रस्तेवर घेवनीं आईलो. एक मोठो गुंडो हाडलोन. गुंडेवर पाय थेवनी सिटावर बेसलो अणि माला पुढल्या दांड्यावर बेसयलोन. तेडला रस्तो तांबडो अणि भरपूर गुंडे सले. आमी नजराआड हयपर्यंत अक्का, वैनी बघीत ह्रेली.

गुंडेना लागोनी माझा भेंडकुल दुखो लागला पण सांगणार कोणाला ? सर्कस बघे हे सहन करे हवां सलां. म्हणी पर्वा न करता बेसोनी ऱ्हेलो. कुंबळीच्या घाट्याला हरगो उतरलो. में बी उतरलो मोग सायकल हातात घेवनी घाटी चालोनी गेले. साडेचारला वाळपय गाठली. तेल्याचे दुकानाकडा सायकल लायली, चावी केली. अणि बोलसात थेयली.

# .... में अणि सर्कस

त्याहां सांखळ्या जावेची बस तयार सली पण, गाडी खचाखच भरलेली, श्वास घेवे सुध्दा जागो नतलो. शंभरावर लोक. तिकीट आठ आणे येवेजावेचे मिळोनि २ रूपये दिले. आम्हीं बरोबर पावणेसहाला सांखळ्या पावले. तिकीट काढे गर्दी सली पण मिळलां. माला खुप तहान लागलेली म्हणी दोघानीं मोठ्या बाटल्यातलो मोठो आवाज करणारो गुड्डीसोडा घेतलो. मोग जीव मात्सो शांत झालो. तिकीट आधीच काढलेला. सगळेत कमी तिकीट खालती बेसेचा आठ आणे, बाकडेचा तिकीट १ रुपयो तर खुर्ची २ रूपये अशी तिकिटा सली. आम्हीं बाकडेचा तिकीट काढला. अणि भितर जावनी बेसले. लोक सारखे येतं सले जात सले.

थोडे वेळान बँड सुरु झालो अणि खेळ पण सुरु. में खेळ  बघत एकदम दंग होवनी गेलो. हरगेचा लक्ष हेडा तेडा सला. कोण बरी चेडवा दिससत का तो बघीत सयवो. हरगो म्हणो लागलो, “ आरे बाबा पळय कितले वाघ हत्ती, सोशे, सिंव्ह अणि तेंच्यो डरकळयो, शि !! भय दिसता मरे !! भितर उडकी मारली जाल्यार काय करपाचे ? “

पण तो एकदम खूष दिसत सलो. एक एक आयटम सुरु झाले. मोठो पिंजरो लायलेलो सलो. तेंचेवर चढोनी अर्धनग्न दादले अणि बायला कसरती करीत सले. हरगो म्हणो लागलो, “आरे बाबा ति पळय कितली उंच चढोन ति बायला झोपाळे खेळतात !! अणि अर्धी ×××× मरे ति" में तेला चूप केलो अणि ओगी न्हेवनीं बघ म्हणी सांगला. वानरासारखो तेंच्यो कसरती बघनी हरगो खूष. हत्तीचो नमस्कार अणि पायेवर लोळण, वाघान्चो फूटबॉल, सिंह स्टुलावर बेसप, कुत्रेंच्यो रींगणात्थीन उडयो असे एक एक बहारदार खेळ. अणि मोग थोडे वेळानं मध्यन्तर झाला.

सगळे लोक आपली नैसरगिक क्रिया करे बाहेर जाव लागले. आम्हीं बाहेर जाणार झालें हरगेचा लक्ष कारा पुढा गेला अणि माला म्हटला, “बाबा मातशे थंय तिसऱ्या रांगेत खुर्ची पळय" चक्क एका खुरच्यात्थीन दादा उठत सलो. में बरे आसा असा म्हटला अणि बाहेर जावनी एक एक चहा अणि भजी खावनी आयले. एता आमचेकडा फक्त चार आणे सले. अजूनी दोन सोडा येणार सले पण शो सोपले उप्रांत घेवे राखोनी थेयले.

दादाला बघनी आधी कापरा भरला पण हरगेन तेचेशी थोडी बातचीत केलीन अणि आम्हीं परत येवनी बेसले.

मध्यांतरा उप्रांत तासाभरान खेळ सोपले. शेवटचो आयटम एक मोठो लोखंडी गोल अणि तेचे भितर जावनी एक माणूस गोलाचे खालथीन फटफटी सुरु करनी काळजात धडकी भरेल असे वेगात गोलाचे वरतीपर्यंत येसे अणि तसोच परत स्पीड मात्शी कमी कमी करीत खालती येसे. खेळ सोपसे. एका बँडचे आवाजावर सगळे कलाकार (प्राणी सोडनी ) सगळेना अभिवादन करसत.

लोकांची एकच गर्दी लोक्कोर भायेर जावनी बसित जागा धरेची. हरगेला एक जागा मिळली ति सुध्दा दादा आमचेच गाड्यात सलेकारणान तेणी खाली करनी तेला बेसे दिलान. बस साधारण रात्री दहाला वाळपयला पावली. रस्तेवर कोणच नाय. थोडे लोक सले ते वाळपय आपले घरांनी पावले. आमला अजूनी पाऊणतास हवो सलो कारण रस्ते तेडला खडबडीत.

# .... में अणि सर्कस

दादान आमला सायकलिंन पुढा जाव सांगलान. थोडे वेळानं तो फटफटी करनीं आमचेपुढा घरा पावलो.

माला घेतलोन नाय कारण मनात मात्सो राग अणि हरगो एकटो पडणार म्हणी. हरगो अणि खुप भित्रो. रस्तो निर्मनुष्य, वाटाला कोणच नाय. रस्तेवर दिवे नाय. सायकलीला डायनॅमो सलो पण पेटत नाय तेमूळा हरगेला खुप कष्ट पडो लागले.
हरगो मात्सो भित्रो, वेळ पण रात्री साधारण ११ हत आयली. वाटांत डुकराची कुटुंबा रस्ते पार करनी गेली कोल्हे तर सारखे आरडत सले. रस्तो तांबडो मध्यां मध्यां गुंडे तेला लागोनी माझो पार्श्वभाग खुप दुखो लागलो. साधी सरोप, वटवाघूळा दिसली का हरगेची भंभेरी उडे.

कुंबळीच्या घाट्याला उतरेचा लागला. कारण ति चढण सायकलीन बेसोनी शक्यच नतलां. चढताना हरगो भ्यालो तो भ्यालो म्हणी मे भ्यालो. घामान अणि कापरा भरोनि कपडे ओले झालें. वारेन पाना सळसळत सली “बाबा पळय मरे भूता झाडा हालयतात. अणि नाका झाल्के आवाज काढतात. अशा रातचो देवचार आपल्या उरफट्या पायान भोवता. माका तेची कांबळ दिसता रे“ हे सगळां ऐकोनी माझो धीर सुटलो. माझा सगळा आंग दुखो लागला. कसे बसे आम्हीं घाट्यावर पावले.

माला लौकर सायकलीवर बेसयलोन. अणि सायकल उतारावर खुप जोरात सोडलीन. त्याहा एक मोठा वळण से, मात्याचो रस्तो सलेकारणान त्याहा खुप शेक्रो सलो. हरगो ब्रेक मारे विसरलो अणि आम्हीं दोघेय ते शेकरेत आडवे झालें अणि आमचेवर सायकल. टायर हवा जावनी रिकामी झालें. एक व्हील मोडला. डायनॅमो अणि पेपारा सत्यानाश झालो. आम्हीं कसे बसे उठत, कणत उठले. माझी ढोपरा, पाय धोंडावानी घेतले. हरगेला सुध्दा खुप मार लागलो.

सायकल चालवी सारखी उरली नतली. कसे बसे चालत साडेअकरा पर्यंत घर गाठला. वैनी, दादा सगळे वाट बघितच सले. आमला बघले बरोबर तेना आमी कितां पराक्रम करनी आईले हेची कल्पना आयली. गुपचूप जेयलो. जखमो सगळयो धोवल्यो, जखमावर काळा औखद फासला. काळा औखद म्हणजे नारळ भाजनी काळो हैपर्यंत, मग तेत तिळेल अणि हळद पावडर घालनी मिक्स करेचा अणि ता तीन चार दिवस जखमावर फासेचा, म्हणजे जखमो बऱ्यो हत. परत पडे मोकळीक.

कोणच कायचं बोलले नाय कदाचित वादळाआधीची शांतता सयेल पण तसा काय झाला नाय पण तेंनंतर नवीन सायकल घरात आईली नाय. एका सर्कशी बरोबर आमची सर्कस पण होवनी गेली

सुभाष भालचंद्र जोशी - पणजी

# आबोली



ससे ओग्गी ओग्गी,
स्वत:लाच सावरीत जाय
मोठ्ठो असो झेत नाय,
काटो - कुटो  तेला नाय
आपले पायेवर उभां ऱ्हेत,
चार चौघात जायवां
हसे सगळां मनासारखां, हे मात्र तेला खबर से

भायेर भीतर, सगळीकडा एकच सूर
मे मोठो तू बारीक, में  श्रीमंत, तूं गरीब ...
कोण कोणाला देत नाय,
कोण कोणाचां खात  नाय
एकीकडा ऱ्हेले शिवाय कितांच हत नाय

म्हणीच  बहुतेक म्हणसत
पानवेलीमुळां शेगुल जगसे
तशी  आपली आमची गत
माडो वाढसे, गिमात फुलसे
पण  तेचां असां से
जां दिससे भडक तां मातसां पुढां
तेला म्हणसत 'रतन'
अणि उरलेली शाणी, पिशी ती आबोली!

श्री कृष्ण गणेश वझे

# Essence अर्क




केंचाय  खास खाणां करताना, आधी गरज पडसे असो घटक म्हणजे अर्क ! Essence !
केक करताना वापरसत.

मुख्य  सामान तांच ससे. तेत हवो तो अर्क घातलो का हवो तो स्वाद मिळसे.

उकडीचे मोदक, पुरणपोळी, केजरीवाल, गुलाबजाम, रबडी असे कितकेसेच खाणांना एक ठराविक चव ससे. केशर, वेलची, जायफळ, हे तीनय एकीकडां मिळले की मजाच करसत! हे लागसत अगदी चिमटीभर. पण हे तिनय एकीकडां मिळले, की जिनसांची रंगत वाढोवनी जासत. अणि तो शिजताना जो दरवळ पसरसे, कडकडोनी भूक लागसे. केडलां ते आपले पानात पडसत अणि केडलां एकदा ते आमी फस्त करसो असा होवनी जासे.

रस्तेवेल्लां खाणां प्रसिद्ध कितांला? होच स्वाद ! तोच अर्क !

केंचेय जिनसाचो आदी वास येसे, तो वास कसलो ?  तसे पदार्थाची कल्पना करसो, मोग डोळेनी बघसो ते उपरांत तो खायवेची इच्छा हसे.

असे कितकेसेच  सुगंध  सत ! अरोमा ! तेणी आमचा आयुष्य व्यापोनी गेलासे.
वेगवेगळे फुलांचो सुगंध. मोगरो, गुलाब, चंपा, चमेली, चाफो, हातो, प्राजक्त फक्त नाव जरी घेतला तरी सुवास आयलेसारखां दिससे.

पयलो पाऊस पडलो काय येणारो 'मृदगंध '! तेडला येणारो मात्याचो वास ! सदांच हवो असां दिससे.

दर्या वरथिन येणारो खारटवास आपले बरोबर नुस्तेचो दर्प घेवनी येसे.
भाज्यांचे बाजारात हरतऱ्हांचे भाज्यांचो मिश्र वास टवटवीत पणाचो अनुभव  देसे.
काफ्याचो वास तर पिसोच करनी सोडसे.
टपऱ्यांवेल्लो अर्धो कप चहा लांबथिनच  बोलायसे.

# Essence अर्क

मांसाहारी प्रेमी मांस, मच्छी मासळी बाजारात एक फेरी मारनी येणार, हो एक उत्सव अणि मांसाहार असली हाटेलां म्हणजे एक पर्वणीच !
त्याहा  पाऊल पडले बरोबर तो ठराविक  वास तुमचो ताबडतोब ताबो घेसे.

वास, सुवास, सुगंध, मृदगंध, खुशबू, परिमल, महक, सौरभ, Aroma, fragrance, flavor, scent हे वेगवेगळ्या भाषांतले वेगवेगळे शब्द सत. तेंचो उपयोग पण तऱ्हातऱ्हाचो हसे. पण सगळेंचा सत्व एकच सुवास, सुगंध.

जगणेसाठी सगळेत गरजाचो ससे, सहवास !
आपले प्रिय माणसांचो सहवास ! तो सदाचं हवोहवोसो दिससे. आपलेला तो सुरक्षित, आनंदी अणि प्रसन्न थेयसे.

थोरा मोठेंचा सानिध्य लाभणां हे भाग्य.
बरे लोकांची संगत अणि सहवास आपलां आयुष्य  समृध्द करीत ससत.
आपलेला घडयसत अणि बिघयडणेत आपण कोणाचे सहवासात  ऱ्हेसो तेंचा खूप मोठा योगदान ससे.

बाकीचें सहवास  मिळयणां तां काय आपले हातात नससे, पण थोडे वेळा आपण  कोणा बरोबर जायवेचां तां आपण ठरोवं शकसो. केडलां केडलां मात थोडेनां टाळू शकत नाय. परिस्थितीच तशी ससे. ते पाश्णी दूर जाणां कठीण हसे. पण केडला हसोनी दूर जायवेचां, केडलां कळोनी नकळले सारखां करणां ! सद्याचां आयुष्य आपण जगसोच, पण तेत हसणेचो, आनंदाचो, समाधानाचो शिडकावो केलो, इसेन्स वापरलो, झाले कितकी मजा येल ! आपलो सहवास बाकीचेनां हवोहवोसो कसो दिसेल, ते साठी आपण थोडे कष्ट घेतले झालेवर सुख आपले पुढां हात जोडनी उभा ऱ्हेनांर.
वेळ लागेल  पण जमणार, एक दिवस पक्क, खात्रीपूर्वक ? सगळेनांच जमणार!

मनाली आगाशे - नाशिक
चित्पावनी अनुवाद - सौ. गायत्री भूस्कुटे, गोवा

# आई




ढगांची  गर्दी हसे, पाऊस भितर कोसळसे

ओलावो झिरपत जासे, दोळेंत पूर जाणवसे

आवंढो दाटोनी येसे सामको हळवो, पापण्यो भिजयसे

मायाची छत्री गावेल, असां दुकान सोदीत जासे

मोग अल्टी पल्टी करसां, उर्ले- सुर्ले वस्तूंची

अंधूक हसे दृष्टी, तेंत आठवण हसे कुशीची

अवचित जाणेन, खिन्न मन अजिबात नाय

ती गेली ह्याची फक्त, हे मनाला खात्री नाय..

हे मनाला खात्री नाय....!

डॉ मंदार खरे – पुणे
चित्पावनी अनुवाद — सौ. आरती मोने

# फसवणूक



कांय फळवाले  अणि भाजीवाले हे खूप मेहनत करनी आपलो माल विके बाजारात हाडसत. पण लोकांना तेची किंमत नस्से.

कांय भाजीवाल्यो एठा पावसाळेत रानभाज्यो विके आयलेल्यो.  कांय फळवाले सुध्दा एका कोपरेत आपली फळां विके घेवनी बेसले सले.

कांय  लोक रानभाज्यो घेत सले, जेना रानभाज्यांची खबरही नतली ते लोक पण भाज्यो घेवनी तेबद्दलची माहितीही चौकशी करीत सले.  त्यो भाज्यो स्वस्त पण सल्यो.  म्हणजे मॉल किंवा मोठे भाजीवालेंचे तुलनात. तसांच फाळवालेकड्थीन पण लोक फळां घेत सले कारण, ती ताजी अणी कमी दरातच मिळत सली.

फळवाले अणी भाजीवाल्यो पण स्वतः थोडां  नुकसान सहन करनी हसतमुखान आपली फळां अणि भाज्यो विकीत सले.

सगळां सुरळीत सुरु सलां पण, अचानक एक काका त्याहां आयले फळां अणि भाज्यांचे दर मोल करनी ती विकत घेत सले.  पण जेड्ला  पैसे देव्वेची वेळ आयली तेड्ला मात्र काकानि राग आयलो,  अणि हुज्जत घालू लागले कि,  तुमी इतकी म्हारग देसा,  दुसऱ्या कडा तर भाजी अजूनी सवाय मिळत सली.  तेवर विक्रेते म्हटले काका पैसे थोडे कमी द्या.  पण नाराज  हंव नाकां.   पण ते काका आयके तयार नतले.   स्वतः तर खूप कमी पैसे देवनी भाज्यो अणि फळां खरेदी केली. वरथींन इतरांना पण सांगत सुटले कि, बघा हे लोक आपलेला कसे फसयसत.  आमला कितकी म्हारग वस्तू देसत. ते विक्रेते तर काकांना विनंती करीत सले.  कि काका असां नाकां करू. आमचां पोट हेचेवर अवलंबूनी से. हेत आमला जास्त फायदो नाय  हत. जां कितां मिळसे तेतच आमला भागवेवां लागसे.  पण नाय!  काका कांयच आयकेला  तयार नतले.

# फसवणूक

आरतीपरती गर्दी जमली. सगळीजणां हे सगळां आयकत अणि बघीत सली. निव्वळ टाईमपास, एक जण मध्यां बोलेल तर शप्पत.

त्याहांच एक शाळकरी भुर्गो पण उभो सलो. तो पण हे सगळां बघीत अणि आयकत सलो. तेला ऱ्हेव्वत नाय जालां. शेवटी तो गर्द्यात्थीन पुढां आयलो. काकांना म्हणो लागलो, काका ! तुमला एक विचारू? काका ऐटीत म्हणो लागले, विचार रे शाण्या. भुर्गो काकांना म्हणो लागलो कि, तुम्ही मॉल मध्यां खरेदीला जासा का ? त्याहां तुमी वस्तू पण घेसा का ? जाले काकान परत ऐटीत हो हो म्हटलांन, में मॉल मध्यां खरेदीला जासां अणि सामान पण घेसां. भरपुर डिस्कावंटवर. भुर्गेन विचारलां, भाज्यो अणि फळां पण तुमी मॉलात डिस्काउंटवर घेसा ? काकान होय म्हटलां. भुर्गेन परत विचारलां, पण त्यो भाज्यो, फळां, खरीच ताजी ससत ? तेवर काका ओग्गी ऱ्हेले. भुर्गेन परत विचारलांन. जेड्ला तुमी मोठे दुकानात भाज्यो किंवा फळां घेसा तेड्ला, त्याहां वाणपण करसा ? काका ओग्गी, भुर्गेंन परत विचारलांन. सांगा काका सांगा. तुम्ही वाणपण करसा का ? काका परत ओग्गी. भुर्गो परत सांगो लागलो. तुमी त्याहां वाणपण करीत नाय. अणी करेचे बी नाय. कारण तुमला खबर से कि, तो दुकानदार तुमला रोकडोच म्हणेल, कि घ्येव्वेचां सेल तर घ्या, नायजाले ...... ....

एता त्याहां जमलेले सगळेजण मान खालती घालनी उभे सले.भुर्गेन सांगे सुरवात केली, कि हे ल्हान ल्हान विक्रेते आपला अणि आपले घरचेंचां पोट भरे खूप मेहनत करसत. वेल्यां कांयवेळा दर कमी करनी स्वतःचां नुकसान पण करनी घेसत. कारण ते गिऱ्हाईकाला देव मानसत. सगळेच ओग्गी सले, स्तब्ध सले.

खरांच जां ते ल्हानगेला समजलां तां मोठेना कय समजनार. कसली कसली एक एक माणसां ससत.

काय काय फळवाले अणि भाजीवाले पण उद्धट ससत.


असेच कांय फळवाले अणि भाजीवाल्यो कांय गिऱ्हायकाना फसयसत.

एकदा एक ताई एका फळवालेकडा फळां घेव्वे गेली, जाले ते फळवाले तागड्यांत घोळ करनी, जास्ती पैसेत कमी फळां दिली . तो सगळेना असोच फसवीत सलो. तीच तऱ्हा भाजीवाल्याची. ती पण अशीच जास्ती पैसेत जून भाज्यो लोकांना देत सली. तेवेळा अशीच एका काकूंन फळवालेला अणि भाजीवाल्याला धडो शिकयलो.

असे ससत एक एक नमुनेदार लोक.

सौ. वर्षा केळकर - बदलापूर.

# मन



मन से हे सगळेनांच  खबर से
पण
मन म्हणजे कितां, हे मात्र खबर नाय
मन म्हणजे मन, मन म्हणजे मन
तसांच
मन आपलां बरां हां!
मनान कारांय जायवे मिळसे
बेसलेले जागेवर्थीन,
काराय भोवडावनीं हाङ्गे

फुकट हा ! कसलोच खर्च  नाय
मांडे, हवे तेड्ला खा, हवे तितके
कोण मनाला पाखरू म्हणसे
मनोमन बरी स्वप्ना दाखयसे

वाईटाचो विचार, किताला करा
मन बरांचं, खरांच मन बरा!
तां एक मास्तरा  सारखा ससे
अरे तुजे मनांत तरी कितां से ?
असे जाण्टेंचे शब्द आईकले की,
मुकाटेनं उठोनी कामाला लागेचा,

आळस जावनी उर्मी येसे
शेवटी सगळेचो अर्थ कितां?
जेचा मन बरां तेचां
तेचां सगळांच  बरां
मुकाट्यानं कोणी बरी स्वप्ना बघसे......

श्री कृष्ण गणेश वझे

# रक्षण निसर्गाचां



मंडळी ! निसर्ग कसोआपली कामांमखी वेळातच करसे. जसो की, सुर्य ठराविक वेळा उगवसे अणि मावळसे. तेणीन एखादेवेळा आळस केलो ते ?
उन्हाळो, पावसाळो, हिवाळो हे ऋतूचक्र चक्रासारखां चालू ससे. जर सूर्यवळात उगवलो नाय, वेळावर पाउस पडलो नाय, थंडी वेळावर पडली नाय तर ? झाडापेडांचा, शेतीबागायतीचां, प्राणीमात्रांचां कसां कितां ? आमची पोटापाण्याची व्यवस्था कशी हनार ?

निसर्गाचे आपलेवर खुप उपकार सत. तेचे बद्दल कृतघ्नता बाळगे हवी. तेचे शिवाय आपलां पानसुध्दा हालत नाय.निसर्गाशी प्रतारणा करनी उपगोगाचां नाय.
सुर्य, चंद्र, तारे,चांदण्यो गोल, ग्रह गोल,नय, व्हाळ समुद्र, झाडांपेडां डोंगर, हवा, पाणी वारो हे सगळांमाणसान तयार केलां नाय. सगळां कितां तां सृष्टीतच दडलेलां से. हि सगळी देवाचीच करणी से. एतां प्रत्यक्ष दव भेटत नाय, दिसत नाय. पण जां कितां, आमला कामा करताना जी कितां शक्ती लागसे ती शक्ती म्हणजेच देव. तेला कारोच सोदेची गरज नाय. तो सगळेत भरलेलो से.म्हणीच, "तुच कर्ता अणी करविता." हें गणां म्हणेनसां दिस्से. सों.......

तर सृष्टीवेल्लो प्रत्येक सजीव निसर्गाची भुर्गी सत. माणुस जेड्ला आपले उदरनिर्वाहासाठी निसर्गातल्या थोड्य गजालींचोउपभोग घेता येत सलो, तेड्ला पर्यंत निसर्गशकतीला कांयच देणाघेणां नतलां.पण जसजसां विज्ञान प्रगत जालां अणि माणसाचे हातात मशिन नावाचां शस्त्र आयलां, तेड्लापाश्णी निसर्ग माणसाचो राग धरु लागलो.

# रक्षण निसर्गाचां

ब्रह्मांडातलो स्वार्थी जिव म्हणी नावारूपालाय येंव आयलो. जंगलाचो राजा सिंह हे फक्त पुस्तकातल्या गोष्टी पुरतांच उरला से. कारण जंगलावर अतिक्रमण करनी, सिंहाला पिंजरेत बंद करनी माणुस राजा हैवे बघसे. मोग एतां प्राणी रान सोडनी, गावात येसत तेत नवल तां कसलां ? तेला जवाबदार आमीच सों. जंगलां उरली नाय, प्राण्यांना खाव्वे फळां नाय. मोग आमला ते सतायणारच.

खरांच, सगळां बगनी, आय्कोनी-बगनी दुःख हसे. पुढांपुढां कितां कितां वाडनी थेयलां से तां देवच जाणे.
हे निसर्गावर एकटेचोच असो अधिकार नाय. जी जमीन आमी तयार केली नाय, जां जंगल आमी तयार केलां नाय जाले आमला झाडां मारेचो अधिकारच नाय. पाऊस पडे हवो जाले आला शक्य सत ते उपाय आमी करेच हवे.

माणसाचो मेंदू ईतर प्राण्यापेक्षा विकसित से, म्हणी सगळेवर अधिकार गाजवेचो प्रयत्न करसा. बरां से. तसां ते माणसान निसर्गाशी वाकडां घेव्वेची तयारी थेव्वे हवी. आजकाल शिमीटाचे जंगलाची सवय जाली से. रिकामी जमीन दिसली रे दिसली कि, तेचेतली झाडां तोडेची, प्लॉट करेचे, झाडां मारनी रस्ते करनी मोठमोठे बंगले बांदेचे. अणि कुंड्यानी झाडां लावेची. मोग गर्मी वाढली कि गजाल मारेची. हेला कितां अर्थ से ? माला सांगा, ही कुंड्यातली बिचारी झाडां, कितकोसो प्राणवायू देणार ? (हेचो अर्थ कुंड्यानी झाडां लांव नाका असो न्हुय.)

मोठमोठे झाडांनी भरलेले डोंगर सले जालेवर पाऊस पडनार, शुध्द हवा मिळनार. तेला लागोनी आमचां आरोग्य बरां उरनार.

आमला बरां लिवव्वे येसे. जे कागदा वरती आमी लिहिसों तो कागद निसर्गात्थीन मिळलो से. महागड्यो गाड्यो, तेत घाले इंधन, उंचचउंच इमारती बांदसत, तेचेत वापरलां जाणारा लाकुड, पोट भरेलागसे तेचेतलो कणानकण , हे सगळां निसर्गानच दिलां से. आमी तेचे देणेकारी सों. तेचे उपकार आमी केड्लाच फेडू शकत नाय.

समुद्राकडा मस्ती केली तर तो त्सुनामीचा रूप धारण करसे. जमीनीकडा मस्ती केली तर भुकंप हौवनी हादरायसे. आकाशाकडा मस्ती केली तर ढगफुटी हौवनी कोसळसे.

एतांच्या पिढ्याला मात्याची एलर्जी हसे. मात्यात काम करे नाकां. पण शिकलेलेना हे कळे हवां कि, माझ्याशिवाय आमी उभे कसे ऱ्हेनार ? मात्यात भरपुर खेळेचां, पाण्यात प्येव्वेचां पावसां भिजेचां, झाडावर चडेचां, फळां खाव्वेची,. निसर्ग हो देवान तयार केलेला एवढां मोठां फुकटचां (गार्डन) उपवन से. तेचो आनंद लुटेचो. निसर्ग एक देणगी से. एक शक्ती से. जी आमी निर्माण करू शकत नाय. अणी नष्ट करेचो अधिकार नाय.

# रक्षण निसर्गाचां

निसर्ग आमचेकडा, वारो पाऊस असे अनेक माध्यमात्थीन संवाद साधसे. पशुपक्षी निसर्गाचे नियम पाळसत जाले आमी कि पाळू नये ? सृष्टीच्या प्रयोगशाळा पुढां आमचां कांयच चालत नाय. निर्माण करेचां अणि नष्ट करेचां तेचेच हातात से.

जगातले सगळे धर्माचेशास्त्रात निसर्ग संवर्धनाचां महत्त्व सांगीतलां से. म्हणी तेचां रक्षण करणां हे आचां आध्य कर्तव्य से. समजा जर पाऊसच पडलो नाय, पाण्याच थेंब नाय, तर कितां हयेल हेची कल्पनाच करवत नाय. सगळेनां तडफडनी, तळमळनी मरेची वेळ येनार से.
म्हणी भरपुर झाडां लावया. तेंची जपणूक करुया. नय नालेत केर कचरो नाका उडवया वृक्षतोड नाका करूया. तरच पाऊस पडेल. (हे सगळां आमी करसों म्हणी तुमला सांगेचां धाडस करसां.) एकंदरीत आमी निसर्गावरच अवलंबूनी सों.

तेड्ला वेळातच सावध हौवनी निसर्गाचा रक्षण करे हवां. नायजाले आयुष्याचो वेळ सोपेचे पैलीच तुमचां आमचां जिवन सोपनार. निसर्गाचो नाश करनी तेच्याच कुशीत निर्माण हैवेचां स्वप्न बघता येत नाय. निसर्ग हीच आमची आई से. जसे आईचे उदरा शिवाय आमचो जन्म नाय.  तसांच सृष्टी शिवाय आमचां जगणां नाय.  म्हणी अखंड मानवजातीन निसर्गाचा रक्षण करणां ही काळाची गरज से.  निसर्गाला वाचवे झाडां लावेची, नाय जाले मानवाला वाचवे झाडां लावेची गरज से.

ह. भ. प. सौ. वंदना जोशी – खडकी, गोवा

# आई



आई हे शब्दाची व्याख्या करे तशी कठीणच. आई हे दोन शब्दांतच सगळां विश्व सामावला से असा म्हटला तरीय अतिशयोक्ती नाय हयवेची.

आईवर मोठमोठे विचारवंत अणि लेखकांनी खूप साहित्य लिहिलां से म्हणी तेंत न पडता आई हे तत्वाबद्दल माझे विचार मांडेचो थोडो प्रयत्न करसां. ती म्हणजे एका मोठया मायेचा भांडार ससे. त्याचेमुळाच  सकल विश्वाचा अस्तित्व;  पण त्याचे अस्तित्वाची जाणीव कितके जणांना ससे कोण जाणे.

भुर्गी जरा मोठी जाली की आईला शहाणपणा शिकवे कमी करीत नाय. भले ती अडाणी सयेल पण त्याची ममता अनाठायी नस्से. ती फक्त आपले भुरगेंचा बरां चितीत ससे. भुर्गी कितकीय मोठी जाली तरीय त्याला तां आपला ल्हान भुर्गाच कसा दिससे. त्याला कायम भुरगेची चिंता.

एकदा का बाईची आई झाली की ती आपलेपेक्षा जास्त भुर्गेंचोच विचार करसे. त्याचा सगळा विश्व म्हणजे त्याची भुर्गी. सगळेंचे पोटाला घालनीं उरला सुरला शिळा पाका खावनी ऱ्हेसे पण पोरांना कमी करीत नाय.

माजी आई आमचे लहानपणात गेली पण अजुनी ती माझें मनात जशीचे तशी से. माजी आई जणू साने गुरुजींच्या 'श्याम ची आई'सारखी. गरीब गाय, साधी सुधी. कष्ट खूप करी. त्याला घरात केंच्याच बाईची मदत नतली. सगळां त्यालाच बघेव्वा लागे. दमछाक हत सली. तेंत वर्षा दोन वर्षाचे अंतरान बाळंतपणा. त्याची तब्येत खालावत गेली अणि तेंतच ती हें जग सोडनी गेली.

आईचो आवाज बरो सलो. आमचो आजोबा कीर्तनकार सलो. कीर्तनाचा निरूपण भजन स्वतःच रचि अणि गाणी चाली लावनी बी सादरीकरण करी. तो गुण त्याला आयलेलो. पण ते काळात बाईची कला चुलीतच होरपोळूनी जाय. कय तरी ती गाणी म्हणे अणि भाऊ पेटी वाजवीत सले हो प्रसंग क्वचितच आमचे नजरात आयलो. आमचे जाणतेपणी हे दृश्य आम्ही बघितला नाय कय. आईकडा शिवणकला सुद्धा सली. गावातले बरेच जणांचे कपडे त्याचे कडा शिलाईसाठी येत सले. शिवणकामाचो हो गुण आमी बहिणीनी घेतलो.

# आई

त्याचो स्वभाव खूपच बरो सलो हेचे बद्दल गावातली कोणय सांगतील. तेबद्दल माला लिव्हेची गरज नाय. माणसान आयुष्यात  हेंच कमवेचा. आपले माघारी आपला बरा नाव उरे हवां.
ती गेली अणि आम्ही पोरकी झालो.

पुढा जेडला आईची उणीव भासे तेडला आम्ही सगळयो भेणीशी एकमेकींच्यो आई होवनीं ती जागा काही प्रमाणात भरनीं काढेचो प्रयत्न करसो.
अशीच एक खबर

'श्यामची आई' सिनेमा आई गेले उपरांत केडला तरी वाडेवर दाखयलेलो तो बघनी खूप रडे आयला, पुस्तक वाचला तेडलाय बी असाच हय.
आई गेले उपरांत आमची नजर चौफेर फक्त त्याला सोदीत सली. सगळेना आई से आमला मात्र देवान पोरकी केली म्हणी खूप वाईट दिसत सला. माझ्या मैत्रीणीच्यो आई येत सल्यो थोडे दिवस. आमला किता तरी खायवे प्यिवे करनीं देत सल्यो. पण असा कितके दिवस चालेचा? तेना सुद्धा तेंचो संसार व्याप सलोच न्हुय.

भाऊंनी लग्न केला अणि केरळथिन आमला एक सावत्र आई हाडली. मावशी म्हणत सलो त्याला. (त्याचेंबद्दल आम्ही ऋणी सों ) ती करी आपले परिन जमेल तसा पण आमलाय बी घरात रांधप अणि बाकी कामा करेवी लागत सली.

सो...

पण आई ची उणीव मात्र केडलाच भरनी येवेची नाय. आई ती आईच. जेना मातृसुख मिळला ती खराच भाग्यवान. आई नसणां हेचा दुःख कोणाला नाय कळेचा.
आज में दोन भुरगेची आई सा, भुर्गी मोठी जाली, नातवंडा पण सत तरीय बी आईपण सोपोत नाय.
डोळे तेंचे वाटाकडा लागलेले ससत.

में एकदा श्री व्यंकटेश माडगूळकरांचा 'करुणाष्टक 'पुस्तक वाचलेला तेंत म्हटला से 'आम्हीआठ जणा म्हणजे आईची आठ दुःखा. असा की म्हटला तेंचेनी हे पुस्तक वाचला की पटसे. माजे चेडीला में असा म्हटलां एकदा आपला भुर्गा म्हणजे आपण दुःखाला दिलेलो जन्म. त्याला बी प्रश्न पडलो. आयकताना विचित्र दिसत सला तरी हे पुस्तक वाचतकत पटसे मात्र.
आईपुराण सोपेचा नाय. माऊली देवाहून ही थोर.

# आई

आईवर लिहिलेली एक कविता. मराठीत से ती समाविष्ट करसा.

आठवतो तो अजून श्रावण...

नव्हती तेव्हा माझी आई
आठवतो तो सुना सुनासा
सणवारांचा रिताच श्रावण..

सारी सृष्टी सजली नटली
आई माझी सजली नटली
अन् बांबूच्या कामट्यावरी
काया तिची ती निपचित पडली

बाहेर सरींचा झिमझिम मारा
देहात रीचवला श्रावण सारा
किती तपांचा काळ ही सरला
आईविनाच मग श्रावण झरला

वाटे कधी तरी  आई येईल
कुशीत मजला अलगद घेइल
श्रावण होऊन झोके देईल

श्रावण सर होऊन ये आई
लेक विनविते तुझिये पायी
लेक विनविते तुझिये पायी... 😔

रोहिणी कुलकर्णी - बेळगाव

● ● ●

## गणपुले फाऊंडेशन ची उद्दिष्टे

- आर्थिक दृष्ट्या सक्षम नसलेल्या न्याती बांधवांना शिक्षणासाठी मदत.
- भारतीय संस्कृतीचे जतन करणे.
- वेद आणि संस्कृत भाषेसाठी काम करणाऱ्या व्यक्ती व संस्थांना मदत.
- शाळांमध्ये संस्कृत भाषेचा प्रसार.
- करिअर व नोकरी साठी आर्थिक दृष्ट्या असक्षम न्याती बांधवांना मदत.
- चित्पावन यूथ फोरम
- चित्पावनी भाषेचा प्रसार.
- नवीन पिढी साठी संस्कार वर्ग.




मायमिरर पब्लिशिंग हाऊस “इकिगाई” हे पुस्तक हेक्टर गार्सिया अणि फ्रान्सेस्क मिरालेस हेंचे पुस्तकाचो अनुवाद -प्रसाद ढापरे हेंनी केलोसे.

‘इकिगाई’ हो वेगळोच शब्द दिससे. जादूई शब्द. इकिगाई म्हणजे जगणेचो उद्देश! हे पुस्तकाचे दोनय लेखक पावसाळे चे दिवसांत एका संध्याकाळचे, टोकियोत (जपानची राजधानी) बोलत सले. चर्चा करीत सले. तसे ते दूर दूर ह्रेत सले पण ते दोघांचोय आवडीचो विषय एक! म्हणीच ती भेट घडली, तेथिंन हे पुस्तकांची निर्मिती झाली, हे पुस्तक पूर्णत्वाला पावला.

पाश्चिमात्य देशांतले लोकांची सध्याची मानसिकता, विशेषतः लोगोथेरपीसारख्यो गोष्टी तेंना जीवनाचो उद्देश जगणेची प्रेरणा देसे.
तेंडला चर्चा केले उपरांत असा लक्षात आयलां एताचे मानसोपचारतज्ज्ञ लोगोथेरपी पेक्षा विद्यापीठात शिकयसत त्योच गोष्टी जास्त प्रमाणात मानसत.
आजसुद्धा जीवनाचो अर्थ सोदे प्रयत्नशील सत.

फक्त खूप वर्खा जगणां! हेचेपेक्षा कितां तरी वेगळो उद्देश से. थोडेनां माला कितां हवा हे बरे पैकी खबर ससे. ते *एका* ध्येयानं जगत ससत. अक्षरशः पिसे होवनीं ध्येया पाठथिंन लागलेले ससत. तर थोडे लोक कायम द्विधा मनस्थितीत!
असा कीं हयवां?

त्याच चर्चाथिंन ‘इकिगाई’ हो शब्द आयलो. हो शब्द त्याहांचे लोकांचे दीर्घायुष्यांचा रहस्य सांगसे.
जपान मधले लोक बाकी देशांशी तुलना केली झाले तेंचेपेक्षा खूप वर्षा जगसत.
सकस अन्न,साधा ह्रेणां. ग्रीन चाहा अणि आल्हाददायक वातावरण.
हे दोनय लेखकांचे लक्षात आयलां की हे विषयावेल्ला एकसुध्दा पुस्तक किंवा व्यक्तिमत्व मार्गदर्शिका नाय.

तेंचे मनात उत्सुकता, ओकिनावा (जपानमधला) ते इतके सगळेच लोक शतायुषी सत झाले हे चे पाठलां कारण ‘इकिगाई’ हेंच तर नसेल?
जे लोकांना ‘इकिगाई’ मिळलां, ते लोक आनंदी, समाधानी, अणि दीर्घायुषी आयुष्य जगले.
पहिला प्रकरण इकिगाई-वय वाढत सतांनाय तरुण ह्रेवेची कला.

## .. पुस्तक परिचय

आपापले जीवनाचो इकिगाई समजणां, अणि ते नुसार वागणां थोडे लोक अजूनही शोध घेसत, माझे जीवनाचो उद्देश कितां? हे समजोनी घेवेचां म्हणजे संयम हवो.
इकिगाई कळणें साठी प्रेरणा, ध्येय, आपलो व्यवसाय, अणि आपले उपजीविकेचां साधन हेवर मुख्यतः ठरसे.

तेत सुध्दा तुमलां  किता आवडसे, तुम्ही कितेंत पारंगत सा, केंचा काम केला जाले तेचो मोबदलो बरो मिळेल, अणि लोकांना तुमचे कडल्या कितां हंवा? तेंची अपेक्षा कितां?
हे मार्क विन हेची आकृती हेवर आधारीत दिलेली से.
किताय काम केला तरी चालसे, पण निवृत्त हंव नाका.
खरां ते जपानी भाषांत निवृत्ती ला शब्दच नाय, त्याहां जीवनाचो उद्देश तेला इतको महत्वाचो ससे की निवृत्त हणेची संकल्पनाच त्याहा अस्तित्वात नाय.

चिरतरुण लोकांचा राज्य, तेंचे दीर्घायुष्याचा रहस्य कितां?
जाले तेचा इकिगाईचा ज्ञान अणि त्याहांची खाद्यसंस्कृती.
ओकिनावा किंवा असेच दीर्घायुषी लोक ह्वेसत त्याहा ब्ल्यू दोन म्हणसत.
त्याहा शोध घेतलो झाले आश्चर्य चकित करनांरी तथ्थां दिसली.

१. हे लोक फक्त जास्त वर्षा  जगसत, इतकाचं नाय हे लोकांना कॅन्सर, किंवा ह्वदय रोगासारखे मोठे अणि जीवघेणे आजार हत नाय.
२. प्रभावी अणि आनंददायी जीवनशैली
३. ८० टक्के पोट भरणां (जेवण माफक) अणि चहा पिनांर (ग्रीन टी)
४.  बायलांना रजोनिवृत्तीत शरीर एकदम बरी साथ देसे.
५. स्मृतीभ्रंशासारखे आजार झालेले दिसत नाय.
ह्यो सगळ्यो गोष्टी सल्यो तरीय, तेंचे दीर्घायुष्याचां  महत्वाचाकारण इकिगाईवर लक्ष केंद्रित करणां! जीवनाचो उद्देश स्पष्ट सणां.

ओकिनावा, जपान, हे ल्हानसे ताटल्यात टोफू अणि भाज्यो घेवनी खासत. मित्रांचो एक ल्हानसो गट तेचे दीर्घायुष्यात महत्वाची भूमिका बजायसे.
सार्डिया, इटली, हे लोक दिवसभरांत अधिक भाज्यो खासत.
लोमा, लिंडा, कॅलिफोर्निया, अमेरिकांतले साहसी लोकांचो अभ्यास केलेलो तेचेवेल्यां असो निष्कर्ष काढलोसे तो असो सद्दा आनंदानं लोक्कोर उठणां, उमेदीनं कामाला जाणां.
शरिराला व्यायाम, चालणां, कार्यरत ह्वेणां तेच बरोबर मेंदूला व्यायाम देणां गरजाचा.
तणावमुक्त जगणेसाठी जागरूक ह्वेणां गरजांचा.

तसाच नुसतांच बेसोनी ह्वेणां, हायपर टेन्शन, अपचन, हाडा ठिसूळ हणां असे आजार जडसत.
दिनचर्या कशी सयवी हे कळणे साठी हें पुस्तक नक्की वाचेवां.

## .. पुस्तक परिचय

‘ग्रीन टी’चा महत्त्व सांगितलां से हे पुस्तकांत. तसाच नावा जरी वेगळी सली तरी सूर्यनमस्कार, व्यायाम प्रकार जे आमी शाळांत शिकलेले सत तसेच दिलेले सत, अणि करे जमणे सारखे सत. यकृत, हृदय, फुफ्फुस, प्लिहा अणि संपूर्ण शरिरावर आवाजाचे (ध्वनीचे) माध्यमाथिंन अंतरात्मेला शांत करणेची उपचार पद्धती सांगितली से.

संगीताचे फायदे, जीवनात ॐ काराचा महत्त्व आमी आयकत आयलेलो सां. तेंमूळा वाचलां काय कळे सोपा दिससे.

तुमचे जीवनाची ईकिगाई तुमलां मिळेवी अणि ते उद्देशान तुम्ही सगळे वाचक दीर्घायुष्यी, आनंदी होवंदत म्हणी हो पुस्तक परिचय दिलो से.
बेस्ट सेलर पुस्तक से, मुखपृष्ठ सुंदर. दीर्घायुषी, निरोगी, अणि आनंदी जीवनांचा जपानी रहस्य!

गायत्री भुस्कुटे
खोर्ली -म्हापसा गोवा.

● ● ●

तेड्ला में मात नसेन!

में सयेन न सयेन, पण हे सगळां जपोनी थेवा |
माजी आशा, माजी भाषा,
विचार, सदाचार सगळां ..

हे सगळां थेयलांसे कुलपात, तुमचे साठी
तुमी मात तेला कुलूप घालू नाकां,
तां से तुमचां, तेला होग्डाव नाकां |

में सगळां वापरलां से, थेयलांसे तुम्ला
नक्कीच हयेल तेंचो उपयोग तुम्ला

जरी सला तेत थोडा दुःख, थोडा सूख |
हे वापरताना तुमचे प्रश्नय सतील खूप
माला मात तेंचो त्रास हनांर,
कारण ते सोडव्वे, में मात नसनांर ||

श्री रामकृष्ण दिनकर सोमण
सारवळी गोवा
९४२३८८३८४३

# पत्र

में आज एक जुना पत्र लिव्हनी तेच ते जुने पत्राची पुनरावृत्ती करीत सां.

असेच मजकुराचा पत्र ति. कै. अण्णांनी म्हणजेच (श्री वामन रामचंद्र बर्वे) माझे वडिलांनी माझेकडल्या लिव्हनी घेतलेला. ती तारीख सली ५/५/१९७० रोजी हे पत्र श्री. महादेव शास्त्री जोशी हेनां श्री वामन रामचंद्र बर्वे हेंचेकडल्या धाडलेला. तां में लिहिलां सलां.

तीर्थरूप ( महादेव शास्त्री जोशी ) शाणुगुरूजी हेनां. तेना शाणु गुरुजी म्हणी ओळखत सले. तेचो जन्म आंबेडे गावातलो, तेनां चित्पावनी भाषा खूप आवडत सली. ते पूणेत ऱ्हेत सले. तरी गोवेथिंन कोणीय गेले की, तेंचे बरोबर चित्पावनी भाषातच बोलत.

॥श्री ॥
दिनांक ५/५/१९७०
तीर्थरूप शाणूकाका हेनां नमस्कार.

आम्ही सगळे बरे सो. तूम्ही बरे सां नी ?
पत्र लिहीणेस कारण की, तुमचे कडथिंन घेतलेला दांडगा, सर्द अणि वायंगण तुमचे शब्दांप्रमाण में जमिनीची सगळी उरलेली रक्कम आषाढी एकादशी झालेवर सरदाचा भात, पेरणीचा, तरवेचा, कुळागराचा काम झालेवर आषाढी एकादशीचे चार दिवसांनी, तुमचे घराशी ( पुणे ) घेवनी येसां.

माला एठातिन पूणे येव्वे साधारण दोन दिवस लागनार सत.
आंबेडेथिन सावंतवाडी. बेळगाव कोल्हापूर पुणे, असो प्रवास से.
तुमचे कडथिंन घेतलेले कुळागरात अमना सुपारी माड्यो, केळी लायल्यो सत. बाकी सगळां बरा सौ सुधाताईला नमस्कार. (सौ.सुधाताई महादेव
शास्त्रीची बाईल).

बाकी सर्व भेटलेवर बोलेचा.
पत्र पावलेवर उत्तर धाडा, म्हणजे माला येवेची तारीख ठरवे बरी पडनार से

आ. विश्वासु,
वा.रा.बर्वे.

दीपक बर्वे – गोवा

# अहो दाम्पत्य स्नेह:



चंदनपूर शहरात सुरेखा अणि सुरेश नावांचा दाम्पत्य सुख-समाधानान, आनंदान संसार करनी ऱ्हेत सली.

सुरेश खूप कष्टाळू, प्रामाणिक अणि सुस्वभावी तर सुरेखा देखणी, सत्शील. लांबसडक काळेभोर केशकलाप सणारी सली. ती आपले केसांची मनापाशणी काळजी (कुयदाद) घेय.
असांच एकदा सुरेखा आपले केंस उगवीत सली. केस उगयता उगयतां फणी एकदम तुटली, मोडली. ती खूपच म्हारग सली.

दुसरे दिवस सुरेश कामांवर जाताना, "माला एक फणी घेव्वनी यें हा !" असां सुरेखान सुरेशाला सांगितलांन.

कामावर जायवेचे गडबडीत सुरेशाचे हातात्थिन घड्याळ खालती पडलां अणि फुटलां. हळूच सुरेशानं तां घड्याळ आपले खिसेत घातलांन अणि तो घराभायेर पडलो.
घड्याळ खालती पडोनी फुटलां म्हणी तेलां वाईट दिसलां.

संध्याकाळा कामावरथिंन येताना सुरेश घड्याळाचे दुकानात गेलो. दुकानदाराला घड्याळ दाखयलां. दुकानदारांन घड्याळ बघितलां अणि हे घड्याळ सारखा हयवेंचा नाय. तेडलां सुरेशान घड्याळ सारखा हत नाय झाले हे घे अणि जितके पैसे हतील ते दे. दुकानदारांन तां घड्याळ घेव्वनी सुरेशाला काय पैसे दिले.

ते पैसेथिंन सुरेशानं एक उत्तम अशी फणी विकती घेतली अणि घरा आयलो.

# .. अहो दाम्पत्य स्नेह:

हेगडा सुरेखान सुरेशाचा घड्याळ पडोनी फुटलां, एतां तेलां कामावर जायवेची वेळ कशी कळणार? नवां घड्याळ घेव्वेचा म्हणी पाठलो पुढलो विचार न करता, ती सामखी 'ब्युटीपार्लंलात' गेली. अणि आपलो केशसंभार तेनां विकलो अणि आयलेले पैसेथिंन एक घड्याळ विकत घेवनी घरा आयली.

सुरेश कामावेंल्ल्यां घरा आयलो. आपण विकत घेतलेली फणी सुरेखाला दिलीन. सुरेशान सुरेखाकडा बघतकत तेचे लक्षात आयला, सुरेखानं आपले केस कापले सत. सुरेशानं त्याला कारण विचारलां.

सुरेखान म्हटलां 'अहो ! तुमी तां मोडलेला घड्याळ घेवनी ऑफिसात गेले. बरा, घड्याळ नसताना तुमलां वेळ कशी कळेल ? म्हणी में माजे केस विकनी, तुमचेसाठी घड्याळ  घेतलां. माजे केस काय दिवसानी वाढणार. पण तुमचा ऑफिसात जाता - येता वेळ कसो कळेचो, म्हणी में असां केलां.

सुरेखाचा म्हणणां आयकोनी सुरेशाला खूप बरा दिसला.
आपलेबद्दल इतकी काळजी, तत्परता बघनी सुरेश गहिवरलो!
सुरेशान माजेसाठी आपला किमती घड्याळ विकनी माझेकरता  म्हारग फणी हाडली ! माजे केस बरे ऱ्हेवे हवे म्हणी, आपली कितकी काळजी घेसे, म्हणी सुरेखा सुखावली.

सुरेश अणि सुरेखा दोघांय आपापले वेल्ली माया, समर्पणवृत्ती लक्षात  आयलेवर अणिकय सुखावली. आनंदी झाली.
हे काण्यांथिन असो बोध मिळसे की, घो - बायलांन  त्याग अणि समर्पण वृत्तीन  संसार केलो झाले तां कुटुंब सुखी समाधानी ऱ्हेसे.

श्री. माधव  गोविंद भुस्कुटे.

# एक आमी ऱ्हेवया

भेद जरी मतामतांत
मान तेला देवया
राग नाका मनामनांत
एक आम्ही ऱ्हेवया।।

कोणीतरी भक्त भोळो
जासे सद्वा देवळांत
कोणतरी मानीत ससे
देवपण मानवात

संत, थोर महात्मेंची
शिकवण जागी थेवया
राग नाका मनामनांत
एक आम्ही ऱ्हेवया।।

वाद झालो कईतरी
विसरोनी तां जायवेचां
खरेचीच साथ बरी
ध्यानात सदा थेवेचां


वाईट देवया सोड्नी
बरा तितकां घेवया
राग नाका मनामनांत
एक आम्ही ऱ्हेवया।।

संकटांचो रिपू आज
जगाला भ्येवयसे
सत्तेची तहान आपली
संहारान निवयसे

आमीच एकमेकांसाठी
राम-कृष्ण होवया
राग नाका मनामनात
एक आम्ही ऱ्हेवया।।

भावना दातार (प्रणया जोशी – धावे, गोवा)

# मन



माणसाचा मन केडला कें धावेल तां सांगता येत नाय. परिस्थिती नाय जाले माणूस त्रासात पडलो की मनात नाका सलेले विचार घोळसत. मानव जात, प्राणी जात जन्माला आयली की मन तयार हैवे सुरुवात झाली. माणसांना किंवा मन जातीला समज आयलो म्हणजे साधारण आम्ही भाकीत करसो की मनातला खरा शेवटी असा म्हणप.

आज रेडिओवर पं. भीमसेन बुवा जोशींचो अभंग चालू सलो. " आता कोठे धावे मन " हो अभंग में आयकलो. खराच मन केडला केंची वाट धरील तां सांगत येत नाय. आषाढी एकादशी आयली की आधीच एक महिनो वारकऱ्यांची मना विठोबा देवाला मिळे पंढरपूरा धावो लागसत. मोग वारकरी हळूहळू तयाऱ्याला लागसत. घरचो जास्त विचार करीत बेसत नाय. तेंचा मन सांगसे विठ्ठल कृपान सगळां सारखां हनार. वारीला भायेर सरताना असंख्य अडचणी वारकऱ्यांना येसत. काही घरानी खाव्वे प्येव्वेची सुद्धा तारांबळ हसे. पण वारकऱ्यांनी मनात ठरयलां की तो जास्त विचार नाय करीत. कारण देवभक्ती अणी मनावर सलेलो विश्वास हीच तेंची देवभक्ती म्हणे हरकत नाय.

'माणसाचा सांडलेला मन हजारकडा ' अशी एक म्हण से. एखादो माणूस बेपत्ता झालो की तो कें केडला धावेल तां सांगता येत नाय. अश्यो गजाली मानसिक धक्के किंवा इतर काही कारणांनी घडसत. तेचा मन कें जासे तेला खबर नस्से. घरातले माणसांची मना मोग विचार करू लागसत. आपले मना प्रमाण प्रत्येकजण शोध कार्याला जासत. कोणाचा मन म्हणसे कें तरी देवळात किंवा मठात सनार. सोदपी माणसाचे तकल्यात हजार विचार येसत. सांगणारे हजारजण. कोण म्हणसे " मे होंडा बाजारात बघलेलो', दुसरो सांगसे "में सोमवारा दुपारी वाडीला बघलेलो तेला". असे खुपजण खुप कितां सांगसत. मोग पडली पाड तेला. सोदनारेचा मन एठा जावं की त्यांहा जावं. तो विचारात पडसे. कितां करेचा सुचत नाय तेला. तो असा सांगसे... ती भाजीवाली बसीत मी बघला म्हणसे. शेवटी मनाचे हजार रस्ते तयार हसत हे खरां.

## .. मन

राजकीय ग्रामपंचायत निवडणूको, विधानसभा निवडणूको किंवा इतर कसल्योय निवडणुको आयल्यो की उमेदवारांची काहीवेळा बरीच फजिती हसे. कोपरा बैठकीत कोणाचा मन किता सांग्से हे कळणां कठीण ससे. केडला कोण उलटेल किंव्हा कौतुक करील तां सांगता नाय येत. कारण कोणाची कामा झाली नाय झाले तो हसोनी दाखयसे. तेचा मन दुखलेला ससे. बोलो लागलो की नुस्ती आग. कारण हीच वेळ ससे बोले. मोग कें लागोनी घेसत राजकारणी लोक ? हजार जणांची मना एकत्र राजकारणात येव्वे कठीण.

"अरे वेड्या मना तळमळशी.." नाट्यसंगीतात मनाचे खेळ सांगितले सत. तो मनात सगळे खेळ करसे. ती आपणाला आवडसे, दिसे सुंदर सौंदर्यवती से. त्याला माझे शिवाय हत नाय. तेचा माझा मन जमसे. तेचे तोंडा वेल्ला हास्य सगळां सांगसे. हेचा मन एत्ता लग्न करूया म्हणसे. हे मनाचे तर्क वितर्क. मोग तेला कोण सांगसे. अरे खुळ्या तुझा मन शांत थेय. तु ओगीच भुल्लो सय. त्याचां मन कितपत तयार से किंवा तु तेचे मनात नसनार.

स्वस्तिक वधु - वर कार्यालयात आज लग्नासाठी बघेचो कार्यक्रम सलो. घरातच कार्यालय सलेलेन काकान सगळी तयारी चोख केली सली. दोनय वाटांन कल्पना दिली सली. कारणा तशीच सली. पण कोणाचा भला हसे हो काकाचो उद्देश. बैठकीला सुरुवात झाली. दोघांना समोरासमोर बेसयली. काही गोष्टी स्पष्ट केल्यो. बोड्यो साधो सलो. तेचे मामान काकाला हयकार से म्हणी खुणान सांगितला. चेड आणि आईचा बाहेर बोलणां हत सलां. बापायचे हातात काय नतला. तेची बघेची भूमिका फक्त. चेड दिसे खास नतली पण उर्मट खूप. चेडीचे हावभावा वेल्ल्या काकाचा मन फिस्कटणार म्हणी सांगे. बघताना किंवा बोड्येकडा बोलताना मनाचो थांग पत्तो लायलो नाय चेडीन. अचानक बैठक खोल्यात आयली. में जासा हा काका म्हणी तडक गेली सुद्धा. काकाचा मन दुखला. मनात नसताना हसलो.

बोड्येचे मामाकडा तेंचे मार्फत माफी मागितली. एका लग्न ठरावात अणी हणाऱ्या सासून दागदागिनेना लागोनी हैदोस घातलो. तेचो अवतार बघनी सगळे लग्न ठराव अर्धेवर सोडनी गेले. एक लग्न जुळत सला दोघांचा बघणा झाला. चेडीचे मनात नाय हे साधारण कळत सलां. पण बापायला लागोनी चेड नखरे करी. मनात खूप किता घोळत सलां. एता पर्यंत बघेचे सात नखरे झालेले. प्रत्येक कडा देखावो चेहरो दाखवप. एका स्थळाला हेचे नखरे लक्षात आयले. शेवटी बापायला खरो अंदाज चेडीन दीलो. उद्या हणारो ठराव मध्यस्थीन रद्द केलो. कारणा *फालतू* म्हणणे पेक्षा बोड्येला नाका सलेली खोटी भूषणां लायली. हेंचा मन फटिंग म्हणी सगळेकडा वार्ता झाली.

आज एक रुग्ण डॉक्टरकडा रोजचे सारखो तपासे गेलो. पाठले दोन तीन महिने तो बरो नतलो. ओखदा घेय. थोडे दिवस बरा दिसे. परत नजें झाला की मनात तेचे हजार प्रश्न येत सले. माला अमुक झाला का? का तमुक झाला का? बाकीचेंची दुखणी आयकोनी आपणालाच असा झाला तर? कोण से माझे सोबत? असे हजार प्रश्न तेचे मनात घोळत सले. शेवटी एका मनोरुग्ण डॉक्टरकडा गेलो. तेणी तेला समजावनी सगळां सांगितला. निजाच्यो गोळ्यो दिल्यो. निज सारखी लागो लागली अणि मनाच्यो चिंता दूर झाल्यो.

## .. मन

आज शेजारचो गणेश हुयेल  मारीत अण्णाचे दारावर आयलो. अण्णा आज हयात नाय पण चोर म्हणी गावात प्रसिद्ध सलो. तेचो बोडयो अणी तेची आई दोघा ऱ्हेत सली. आपले स्कूटरचो टायर चोरलो म्हणी तक्रार गणेशान केली. आईचा मन भ्याला.  हो बी घोवा सारखो चोरी करसे का हो संशय आयलो. मनात नाका ते विचार घोळो लागले. बॉड्येचे प्रताप सोदनी काढेचे पडले असा मन सांगो लागला. तेचे खिसे तपासेचे पडले,  म्हणी मन सांगसे. मन वेगवेगळां तपासाचे दिशान धावो लागलां. पण दुसरे वाटान मन सांगे बोड्यो असा केडलाच करेचो नाय. कारण घोव आयकत नतलो तरी तेनी बोड्येवर संस्कार बरे केलेले. त्याला खात्री सली तो असा करेचो नाय म्हणी. शेवटी मनाचा खरा ठरला. गणेशाचे बोडयेन टायर सोरेला विकलो हे नकळत सिद्ध झाला.

मनाचे बरे वाईट खूप विचार घडसत. केंचा बरा केंचा वाईट हे काहीवेळा मन ठरयसे. काहीवेळा कोण कायेक बोलो शकत नाय म्हणी मनात दडपूनी थेयसत. मोग केडला तरी असले मनाचे विचाराचो स्फोट हसे. मग कायवेळा पिसेगत माणूस रस्तेवर फिर्से. मग आम्ही म्हणसो तो केडला बोलत नतलो. फक्त मनात धरनी धरनी पिसो झालो.

शेवटी माझा म्हणणां इतकाच मन म्हणजे आमीच. आमीच योग्य वेळाला मनाला ताबेत थेव्वे हवां. मन म्हणजे एक विश्वास म्हणे हरकत नाय. दुसरेकडा बोलताना तेचां मन सांभाळणां  खूप गरजांचा ससे. एकवेळ मारलेला थापट बरां पण दुखावलेला मन वाईट म्हणे हरकत नाय. प्रत्येकाची मना कशी आनंदी समाधानी हतील हेचो विचार आमी सगळे करूया. बरे वागले जाले मना आपणच बरी जुळसत. मन, विश्वास, प्रामाणिकपणा प्रेम म्हणजेच आपला मन ससे, असां माझा म्हणणां. देवा सगळेंना आनंदात सुखात थेय. महत्वाचां म्हणजे सगळेंची मना स्वच्छ अणी शुद्ध कायम सौंदे.

राजू बर्वे - सातोडे, सत्तरी, गोवा



# वाट

एकाच  दिशानं
परत परत जावं लागलो
येवं लागलो
काय एक मळण हसे
तेला म्हणसत  वाट
मोग ती कारीय सों

जमनीवर ससे वाट
पाण्यावर ससे वाट
आकाशात ससे वाट
झाडापेडावरय सयेल
असा माला दिससे

एतां बघा हां
वाकडी वाट
सरळ वाट
पायवाट
बारीक वाट मोठी वाट
वळणां वळणांवर वाट
रस्तो सुध्दा वाटाचोच
सुधारलेलो भाऊश हा!
हे सगळां जरी खरां सला

तरी...

अणि एक कोणाला न दिसणारी बरीऽऽ वाट से
ती एकटोच दाखयसे
'गुरूबीन  कौन बताये? ती वाट!.

श्री. कृष्ण गणेश वझे.

# आकाशपाळणो



'आमची बायलांची मेली कामां सोपतच नाय' म्हटलां तरी कय तरी, कारो तरी टाईमपास करेची इच्छा मनात दडोनी ससेच.

दर दिवसा उठोनी नोकऱ्याला जायवेचा ससे. म्हणी रविवारा करेची  भरपूर घरकामां शनिवाराच मनात ठरयलेली सली. थोडी झाली, थोडी नाय असां म्हणत रविवार मावळे पावलो. पण हो सरतो रविवार माला, माझे चेडीला अणि बोड्येला वेगळोच, मजेशीर, अनुभव देवनी गेलो.

झाला असां, बेळगावात अन्नोत्सव सुरू झालेलो. माझे भुर्गेंचे मनात त्याहां जायवेचो विचार घोळत सलो. पण माला बी घेवनी जातील अशी अपेक्षाच केली नतली. माझ्यो दोन जावो पण जायवे तयार झाल्यो, म्हणी सगळी मिळोनी गेलो. आम्ही हवा तां पोटभर खाल्ला अणि परतताना भुर्गेनी ठरयला 'ह्यावेळा Giant wheel' मध्यां बेसेचांच'. हे आधी आम्ही तिघा कइच बेसलो नतलो. माला विचारलेंनी, आई तू येणार? का म्हणी. में पण 'मनाचो हिय्या' का कोण तो करनी 'येसां म्हणी 'तयार झाल्यां.

तिकिटा ४ काढली, जावांनी नाय म्हटला. लायनीत थांबलो. समोरच तो आकाशपाळणो उंच जात सलो अणि नेटान फिरत सलो तां बघनी गणिताचे तोंडी परीक्षाचे वेळा नाय झाले शाळात 'ईनीस्पेक्टर' येतकत पोटात धडकी भरे तशी गत माजी, चेडीची झालेली. बोड्येचीय अवस्था खूपशी वेगळी नतली. (असां तो मोग आमला सांगत सलो 😆 ).

# आकाशपाळणो

बरोबर आयलेलो पुतण्यो मात्र एकदा, दोनदा आधी बेसलेलो. एकदा असांच पाठी पोळोनी जाव का, असो विचार येवनी गेलो. पण तितकेत लाईन सोपली आणि आमचे पुढेत तो पाळणो आयलो. आधी आमी ठरयलेला एका पाळणेत माझो बोडयो अणि मे, दुसरेत चेड अणि पुतण्यो. पण झालां वेगळाच. तेंची पयली लाईन सली, ते दोघय पुढा गेले अणि  पयल्याच फेऱ्यात बेसले. आमी दोघी भित्र्यो तेचे पुढले राऊंडला उरलो. आमी दोघी समोरासमोर बेसलो. धरे पट्टयो सल्यो तेना घट्ट धरनी बसलो. हळू हळू फिरोनी वरती गेलो, त्याहां एक selfie बी काढली. ते पाळणेचो स्पीड बघितलेलो तो विचार करनी तेडला खराच मनात आयलां, कदाचित ही आमची शेवटची बी selfie सएल का कितां..

सगळी लोका बेसली अणि हळू हळू गती वाढो लागली. वरती जाताना मातसां दूर बघीत सतानाच खालती झेप घेताना डोळे घट्ट मिटनी घेतले तरी पोटात खड्डो पडत सलो. मजाय दिसत सली अणि भयय दिसत सलो. माझी ही गत जाले चेडीची ते पेक्षा गाळण उडलेली. नेटान फिरो लागतकत ह्यानी आई....  मेले, मेले असा आड्डे सुरू केलान. पाय बी घट्ट दाबनी लावीत सली, डोळे घट्ट मिटवनी घेतलेले. 😂 त्याला मे धीर देत सल्या, जणू काय मे हे आधी दहा, बारा वेळा बेसल्या सां तसले पाळणेत. मन चिंती ते वैरी न चिंती, खराच ह्याला वेल्ले वरती कितां झाला झाले, असलोय अभद्र विचार येवनी गेलो 🤪 . ( हे मोग सांगताना खूप हसे येसे ). ४,५ फेरे झाले अणि फिरेचा प्रमाण कमी झाला. हुश्श म्हणत खालती उतरलो. खालती ती चौघा आमची दोघींची वाट बघीत सली. तेना अणि घराशी सगळेना सांगताना, बाकी सगळी खाल्लेली, फिरलेली मजा सोडणी, मेले.. मेले.. इतकाच कानात घुमत ऱ्हेला.

असो तो रविवार एक प्रकारचो आनंद, थरारक अणि मजेशीर कइच न विसरे हनारो अनुभव देवनी गेलो.

भावना दातार - बेळगुंदी,बेळगाव

# श्रद्धा अणि विश्वास

माला माजे ल्हानपणांत आजीन सांगितलेली काणी एठा में तुम्ला सांगसां.
त्याची ही काणी आईकता आईकता आम्ला भुर्गेनां निद केडला लागे हे मात्र कळत नतलां....
एका गावांत एक गरीब कूटूंब ऱ्हेत सलां. तेना तीन चेडी सल्यो.

रुपवान, बऱ्यो शांत स्वभावाच्यो सल्यो, पण बोलताना लागत सल्यो. बोलणां लुडबां, तोतरां हत सलां. सद्दानीं शाळांत जायवेचां. अभ्यास करेचो. तेच बरोबर आवशी बापाशीला ( आई - बाबाला) कामात मदत करीत सली. योगासनांच्यो कसरती करे तीनय चेडी खूपच पारंगत, शिकेला हूशार. आवशीला घरांत खूप मदत करीत. असां करता करता चेडी वयांत आयल्यो. शिक्षणांत पयले नंबरांन पास जाल्यो. पुढां आयले - पैले सोयरे धायरे, आपुलक्यान चौकशी करू लागले.

कोणां कोणाचां ते बोलप असाय सत सलां की काका .. काकी ... , एतां चेडी तुमच्यो लग्नाच्यो हत आयल्यो सत. देखण्यो सत पण कितां काय म्हटलेवर, लुडब्यो बोलसत. बोलतांना अडखळसत. बोलणां खूपच लागसे. "कसां होणार गो बाये तुमचां !" हे पालुपद जोडनीं निंदा सोपत सली. मात्र तेचेवर काकी शांतपणांन सांगत सली, "आमचो देव से, तो करनांर से कसां तां, तुम्ला काळजी नाकां तेंची !"

असां बोलोनीं, आवूस घरांत येव्नी खूप रडत सली.

बापूस आपलो नित्यनेमान देवांची पुजा करता करता, सद्दानीं देवाकडा एकच मागणां मागत सलो, "देवा माजे चेडीनां बरी वाचा दे! शेवट कितां आई - बाबाचा काळीज तां..!

एक दिवस शनिवारा सकाळी लोक्कोर उठोनी देवळांत पूजा अर्चा करीत सतानां, ते वेळा त्याहां एक साधू आयलो अणि बेसलो. आरती सोपकतच काका साधूचे पाया पडलो. नमस्कार केलोन. ते बरोबर साधून आपले कमंडलुतलां, तीर्थ अणि बीभूती देवनीं सांगितलांन की, "हे तीर्थ व बीभूती तुजे चेडिनां दे; सद्दानीं तीर्थ देत ऱ्हे. त्यांचा बोलप सुधारेल. चल, काळजी करू नाकां!" असां सांगोनीं साधु जायवे गेले. असां करतां करतां, काय दिवसांत होकलाना बघे न्हवरे येवं लागले.

असोच एक दिवस उजाडलो. दूरथीन एक कुटुंब चेड बघे आयलां सलां. सोयरेना जेव्वे वाढलां. चेडीनां आधीच आईन बजावनी सांगलांन सलां, "भायेर वाढताना मात्र तुमी एक शब्द बोलेचो नाय!" वाढनीं हतकत तीनय चेडिनांय पंगतीत जेव्वे बेसयलीन. अणि एक शब्द बोलो नाकां हा असां प्रत्येकिला सांगलान सलां. पण म्हणसत न्हुय, "सवयीची गाय, धावांवरच जानांर!"

जेयतांना चेडीन म्हटलांन "अले वाआआ...! आका.., आज तदी दोड जाली शे!" हां बयोबय...! "जीयां, मीई, यायला, म्हनि तडी, गोड ss जाली से! मोग तेवर दुसरी बोयली, "अदो तुया आईनं बोयो नाता म्हनोनी सांगला सलां मगो? जालेवल पयली आपनच बोयलीश!" तितकेंत आईचे कानांवर हे शब्द पडले बरोबर, चेडीकडां मोठ्ठे दोळे करनीं बघीतलान मात, धाकटीन रोकडाच म्हटलांन, "आई...sss, आका बोयई, ताई बोयई... में नाय बोय्या."

पंगतीत बेसलेली सगळीजणां एकमेकाकडा बघ्नी दोळेनच खाणांखुणां करीत "चला एक मोठा संकट टळ्ळा!" असे आविर्भावात उठोनी आचवे गेले. "आम्ला फटवनी असली चेड आमचे बोड्येला देनांर सलीत" आम्ला क्षणभरय एठा न्हेवेचां नाय.

आवशीला हूंदको आयलो, "देवा कसली परीक्षा घेसय रे आमची?" असां म्हणत डोळेना पदर लायलोन. तिघाय आवशीकडा आयली. चेडीनी आवशीला मिठीत घेव्नी सांगला, आई...., "बरां जाला तेनां एतांच कळला; नाय जालेवर लग्न हतकत छळवाद हनांर सलो. आई तू रडोनाका, आमचे पाठल्या देव से. साधून दिलेली बिबूत अणि तीर्थ से. तीर्थ पिव्नी बरां बोले येनांर से आम्ला." अणि हें शंभर पटीन खरां हनांर असो सगळेंना विश्वास परमेश्वरा वर सलो.

काय दिवसांनी इवळां इवळां तीनही चेडीनां एक एक शब्द स्पष्ट बोले येवं लागले. आई, ताई, बाबा, आका असे अनेक शब्दोच्चार बरे हसत हे आयकोनी आई बाबा आनंदीत जाली. कालांतरान एक एक करनीं तिघींची लग्ना जाली. आपले संसारात आनंदात न्हेवं लागल्यो. तेच बरोबर, "देवाची कृपादृष्टी सयेल, अणि आपली श्रद्धा सयेल ते मोठेतलां मोठां संकट सुद्धा दूर हसे" हे गोष्टीचो आई बाबाला विश्वास जालो. दोघांनी देवाचे आभार मानत आपली उर्वरित जबाबदारी आनंदान पेलत न्हेली.

श्रीमती रमा जोशी,
वास्को- गोवा.


●●●

## चित्पावन यूथ फोरम ची उद्दिष्टे

- ज्या चित्पावन तरुणांना आपल्या ज्ञाती साठी काहीतरी करायची इच्छा आहे अश्या तरुणांचं एकत्रीकरण करणे.
- चित्पावन ज्ञातीच्या संवर्धनासाठी कोणते उपक्रम राबवावेत या बद्दल विचार मंथन करून कृती करणे.
- चित्पावन तरुण / तरुणींना शिक्षण, नोकरी, व्यवसायाबद्दल मार्गदर्शन करणे.
- तरुणांना आपल्या ज्ञातीचा अभिमान वाटेल अश्या गोष्टी, आपला इतिहास दाखवउन देणं आणि अशाप्रकारच्या उपक्रमांमध्ये सामील होण्यासाठी प्रोत्साहित करणे.

अधिक माहितीसाठी व युथ फोरम मध्ये सहभागी होण्याची इच्छा असल्यास संपर्क करा.

# मोडी लिपी




आमी चित्पावनी बोलसों, आईकसों, पण लिहे मात देवनागरी लिपी वापरसों. यादवकाळांत, शिवकालात इतकेच न्हूय, इंग्रज राजवटीत सुद्धा मोडी लिपी बरेपैकी वापरात सली. स्वातंत्र्य मिळले उपरांत हळू हळू हत गेलेले बदलांत एकंदर ह्या लिपीचा उपयोग थांबलो.

पण आज सुद्धा सरकारी कचेऱ्यात, ऐतिहासिक दस्तावेज, वेगवेगळ्यो नोंदी, बखरी मोडी लिपीतच सत. तेंचो हयवे हवो सलो, तितको अभ्यास झालेलो नाय. वापरात नाय म्हणी ती निरर्थक झालेली नाय.
आपली संस्कृती, इतिहासाची जपणूक हयवे हवी म्हणी "मोडी लिपी" शिक्षण प्रसारक मंडळाचो प्रशिक्षण वर्ग आयोजित करसत.

हालीच झाला तां मराठा आंदोलक "कुणबी मराठा"( नोंद सरोदे सरकारी दरबारात मोडी तज्ञ हवे लागले.)??

साधारण ७०० ते ८०० वर्खापयली, तेडलाचो काळ विचारात घेतलो झाले कागद, भूर्जपत्रांची , कमळाची पानांची चणचण आणि तेंची हणारी नासाडी हे चिंता करणेचेच विषय सले. म्हणी विचारपूर्वक लेखन पद्धत वापरताना लिपी सुधारणेचां काम केलान, तां यादवांचे पंतप्रधानान, हेमाड पंत किंव्हा हेमाद्री पतीन.

देवनागरी लिहीताना अक्षरा खूपदा हात उखलोनी लिहेवी लागत. लेखनाची गती वाढयणे साठी तेंत बदल हणां गरजेचा, हे बदल तेणी करनी घेतले. सगळे कागदपत्रांचा/दस्तावेज लेखन केलां. तेर्थीन जल्माला आयली ती "मोडी लिपी"!
थोडकेत, राजदरबारात घडणाऱ्यो घडामोडी, बैठको अणि बाकीचे पत्रव्यवहार नोंदी रोकड्यो हयव्यो म्हणीच हो प्रयत्न सलो.

नेहा चक्रदेव - सोलापूर.
चित्पावनी अनुवाद -सौ. गायत्री श्रीपाद भुस्कुटे

# ऑनलाईन



बऱ्यो वाईट गजाली एतां आमी चेटिंग वर करसां
अतशा आमी सगळेंना ऑनलाईन मेळसां

पयलीं जेडला  लेंडलाईनवर नंबर आमी लावीत सलों
टेलीफोनाच्या वायरीथीन डायरेक्ट मनात पावत सलों
आवाज मात्सो वेगळो आयलो तरी जाणीव हत सली
हॅलो असां म्हण्टाना सुद्धा आपुलकी कळत सली
केमेरॉ नतलो तरी तोणां एकमेकाची दिसत सलीं
अणी फोन  थेयलो तरी बोलणी चालू ऱ्हेत सलीं
एतां वाईट दिसलां कि रडकी तोणा (ईमोजी) घालनी धाडसां
अतशा आमी सगळेंना ऑनलाईनच मेळसां

कोणाला बक्षीस गावों दे नाय जाले प्रोमोशन
फक्त 👍 आंगठो दाखवनी करसां आमी अभिनंदन
कोणी गेलो जालेवर 🙏 असलो मेसेज धाडसां
अतशा आमी सगळेंना ऑनलाईन मेळसां

पयलीं एक दुसरेकडा जाणां येणां सहज सलां
गोष्टी करणां, इस्पीकांचो डाव खेळणां होत सलां
उशीर झालो तरी जेवे सगळीं वाट बघत सलीं
बरोबर बेसोनी गजाली मारीत सगळीं जेवित सलीं
"will be late, don't wait" असे मेसेज एतां सोडनी देसां
अतशा आमी सगळेंना ऑनलाईन मेळसां

ऑनलाइन सबंध एतां आमला सवईचे झाले सत
ऑफलाईन नातीं सगळीं कोपरेंत जावनी बेसली सत
"All well" म्हणत आमी एतां "बरां बरां" तीतकां सांगसां
"टायमच नाय रे" असां म्हणोनी नातेत थोडां अंतर थेयसां
चुकोनी मनातलां बाहेर आयलां जाले रोकडिच ऑफलाईन होसां
अतशा आमी सगळेंना ऑनलाईनच मेळसां

पंक्ती जोग – अहमदाबाद

# अनुभव




एकदा किता झाला में अडवई शाळात्थीन घराशी येत सल्या तेड्ला रेडेघाटित रस्तेवर बशीला ऱ्हेलेली सताना एक चारचाकी गाडी आयली टिचर घराशी जासा नी ? में तुमला सोडसां.

ज्या वेळा तेणी गाडी थारायली तेड्ला माजे मनात सुद्धा आयला नाय, भुक लागलेली, लवकर घराशी जायवे हवा. में  गाड्यात बेसल्या तसो तो माला एक एक प्रश्न विचारु लागलो. तुझे घरात कोण कोण सत ? तुजे मिस्टर कें सत ? असा कितां कितां माला विचारू लागलो, तु एकटी कय ससय में येसा.

मला तेचो अंदाज आयलो किता तरी गडबड से  में तेला खरा कितांच सांगितला नाय. तेय्सा गुरुवार सलो मनात मे दत्त महाराजांना सांगत एकदा वडाकडा उतरल्या. माजी वेळ बरी सली माला किता खायवे देवनीं जर कितां केलेला जालेवर कोणाला कळणार नतला.

जगात कसे कसे लोक ससत कळत नाय. एतां हे आंबटशौकिन तेना बाई दिसली का झाला. तरी माजी वेळ बरी सली. में एकदा गडबड करनी गाड्यात्थींन उतरल्या. अणि सुस्कारो सोडलो.

घराशी येउनी देवाला पाचवातींचो दिवो लायलो. श्री दत्तगुरुंची क्रुपाच म्हणेची. असे खुप अनुभव आयले तेतलो हो एक प्रसंग.

श्रीमती अश्विनी फाटक – सालेली, सत्तरी, गोवा.

# भूतस्य कथा रम्या



परवां रात्री इस्पिक खेळे म्हणी अंतूकाकाचे घराशीं गेलेलों.
अंतूकाका धरनी पांचच जण जमलेले. कोटानी खेळनार जाले सहा जण हवेच. न चुकतां खेळे येणारे नामूचो अजुनी पत्तो नतलो. एरवीं तो केडला उशीर करीत नाय.
"वागांन खाल्लोन का कितां रे नामूला, का केंचे भुतान बी धरलोन?" कोणीतरी करवादोनी, पण मजान म्हटलांन.

भूत म्हणतकत अंतूकाकाला कितां तरी आठवलां. "नामू येयसर तुमला भुताची एक खरी काणी सांगसां. आयका!"
अंतूकाकान सांगे सुरवात केलीन........

"माला निदवताना मात्शी पुस्तक वाचेची बी सवय से. गुरुनाथ नाईक, बाबा कदम, नारायण धारप हे माझे आवडते लेखक. ते दिवसा असोच धारपांचा पुस्तक वाचनी निदवलेलों. डोळेंसमोर कादंब-यांतलींच दृश्यां तरळत सलीं. थोडे वेळान नीज लागली. निदवनी जेमतेम पंधरा मिन्टां झालीं सतील. कसले तरी आवाजान धडपडोनी जागो झालों. "अरे,धावा रे धावा, कोणतरी धावा रे, बाबा रे, मेलों रे" असां मोठमोठ्यानी आड्डुत कोणतरी धांवत आयलेलो दिसलो. "अरे कितां झालां, कितां झालां?" असां विचारीसर तो धपापत पुढेंत पावलो. भाएर पिठूर का कसलां तां चान्ना पडलेलां. दारांतले माडाचीं चुट्टां वारेन हालत सलीं अणि चित्रविचित्र आकाराच्यो हालत्यो सावळ्यो खळेंत पडत सल्यो. कर्कश्श आरडणारी ती कीड किर्र आवाज करीत सली. (अणि तेडलाचे वातावरणाचां खोलांत वर्णन जेना हवां सयेल, तेंचेनी धारपांची एखादी कादंबरी वाचेवी!)

# .. भूतस्य कथा रम्या

तीन चार किलोमीटर धांवत गंगो घामाघूम होवनी खरसावोनी दारांत उभो सलो. पाय-यावरच तेणी अक्षरशः घालनी घेतलान. तो पर्यंत तेचे आवाजान घरांतलीं सगळींच जागी झालेलीं.
"भाऊ, भाऊ, भुतां सत मरे मळेंत! कणकीनी सत. हालयसत त्यांहां कणकी. सावळो त्यांहांच तोंडान राम राम म्हणत एका साकांत घुसपटी करनी -हेलो से. कोण जाणे जितो तरी से का खाल्लोन तेला भुतान."

मळावर दरवर्खाप्रमाण गांवांतले लोकांनी सुपा-यो सुकत घायलेल्यो. आळीपाळीन दोघ-तीघजण रखवाली करीत सले. जवळजवळ दोन अडीच म्हयने हो उद्योग सत सलो.
केडलाय चार आठ दिवसांनी चणेचो रोस अणि पावांची पार्टी सयवेची. तेडला सगळेजण जमेचे. पेट्रोमॅक्साचे उजेडांत जमिनीवर साक पगळूनी इस्पिकांचो कोट रंगेचो. कडाला पानाचां पाळां हवांच. खेळांतली पिसणी फिरत सली तसां पाळांय फिरत सलां. सगळेंचे घरांतलीं चिल्लींपिल्लींय त्यांहांच धांवचेलेनी, लंगडी असले खेळ खेळत सलीं. तेंतलोच कोण तरी सुपा-यांवर घसरोनी हटकुनी पडेचो.

काय भुरगेंचो मोठो बोवाळ! मॉग खेळे बेसलेले तेंचेवर धेंसके घालीत सले. मात्सो भुरगेंचो आवाज कमी झालो काय परत खेळणारे खेळांत गुंग!
बंडो चणेचे रोसाचो "पेशालीस्ट"! तेमुळां ती जबाबदारी तेचेवर! जनू तेला "बरो झणझणीत होंव दे रे! खाल्लेबरोबर थंडी बरी हयवे हवी." असो हुकूम सोडी. रोस कितकोय तिखट झालो तरी, "अणि मात्सां तिखट हवां सलां " हें वाक्य म्हटलेशिवाय जनूचां समाधान हंत नतलां.

एका वर्खा बंडेन रोस तयार हतकत थोडो रोस एका वेगळ्या पातेल्यांत काढलोन, अणि तेंत अणि दोन मुठी तांबडी फकी दिलीन मारनी! अणि स्वतः तो रोस एका पोंवल्यांत घायलोन अणि तो जनूचे पुढेंत थेयलोन. ताटांबिटां हाडेचे /घासेचे वाजाला पोंवल्यांचोच उपयोग करीत सले. खावनी जालां काय त्याहांच त्यो उडयल्यो, (कमरावेल्ले किंवा खांदेवेल्ले) पंचेला हात फुसले काय झालां!

जनूचे लक्षांत बंडेची चलाखी आयली नाय. बाकीचे लोक भुरगेबाळांसकट सहज "बरो जालो से रे रोस, पाव्वरफुल!" असां म्हणत खासत तां बघनी जनूला कांय बोलतां येंत नाय झालां.
"जेवणाउपरांतच मे दोन पेले पाणी प्येसां,जेयताना मध्यां केडलाच प्येंत नाय" असां ओंडरान सांगणारो जनू, आज मात्र प्रत्येक घासाला पाण्याचो पेलो तोंडाला लावीत सलो.
तेचेपाठलां गुपित फक्त बंडेला खबर सलां. साळसूदपणान तेणी जनूला विचारलान, "बरो जालो से नी रोस?" जनून पावाचो मोठो कुटको तोंडांत ढकलीत, अणि पाण्याचो पेलो तोंडाला लावीत उत्तर देवेचां टाळलान.

## .. भूतस्य कथा रम्या

ते दिवसाय अशीच फिस्ट करनी सगळे घरा परतलेले. सावळो अणि गंगो दोघच मळावर -हेलेले. तेंतलो, जीव गळेशीं आयलेलो गंगो धांवत धांवत आमचे घराशीं आयलेलो. तेणी पुढां सांगे सुरवात केलीन " तुमी सगळे खावनी घराशीं आयलेत, आमी उल्लेले पाव अणि रस खाल्लो अणि त्यांहांच कडाला तोपांत पाणी घालनी थेयलां अणि निदवलों, निदवनी पंधरा वीस मिन्टां होसत म्हणेसर सावळेन माला उठयलोन. तेला जोर आयलोसे बहुतेक. तेचे हात माला उनुनीत लागले. कुडकुडत सलो तो थंड्यान. माला खुणानच तेणी दूर कसलो तरी आवाज येसे म्हणी सांगलान. में तेगडा बघसां जाले कणकी हाललेल्यो दिसत सल्यो चान्नेत. अणि सुक्यो कणकी हाणलेसारखो आवाज येंत सलो. अणिकय वेगवेगळे आवाज येंत सले. सावळेला में आमी पळोनी जावया म्हणी सांगलां, पण तेचेंत चालत येवेचां त्राण नाय. में तेला पांघरूणात घुसपटी करनी निदव म्हणी सांगलां अणि त्यांहांथीन फुजो काढली. वाटांत येताना माजेवरय कोणतरी गुंडे मारीत सलो. मे पाठी वळोनी न बघतां, तसोच धांवत -हेलों. भु.....भु....भुताचांच काम हें!“

अजूनीय भयान थरथरणारे गंगेन इतिवृत्त सांगलान.

में तडक घरांत जावनी देवाला लोटांगण घायलां. तांदूळ मंत्रूनी घेतले, एक कोयतो आकड्याला लायलो, घरभरीं फिरोनी बॅटरी सोदनी काढली. पेटवनी बघली जाले पेटत नाय. बॅट-याचे तोंडावर दोन तीन दणके देतकत ती पेटली, पण त्याच्यो सेली इतक्यो जुन्यो जालेल्यो की ती बॅटरी पेटसे का नाय ती बघे दुसरी बॅटरी घेवनी बघेची पडेवी! देवाचे कृपान घरांत नव्यो सेली हाडलेल्यो सल्यो. त्यो  बॅट-यांत घायल्यो. परत दोन तीन थापटां बेसयले बरोबर ती पेटों लागली. भाएर चान्ना सलां. बॅटरी पेटयली जाले भुताला आमचो नेमको ठावठिकाणो कळनार, म्हणी बॅटरी खिसेंतच थेयली. तशीच वेळ आयली जाले काढेची भाएर! गंगेकडा एक कुराड दिली. तो परत मळावर येव्वे कसोच तयार नतलो, पण उसना अवसान हाडनी में गंगेला धीर देंत भाएर काढलो. तोंडांतले तोंडात रामरक्षा म्हणत, अर्धे धांवत अर्धे चालत आमी मळाहारीं जांत -हेलों. मळावर पावतां पावतां आमी दोघय घामाघुम जालेलों.

श्वासोच्छ्वास जोरांत हत सलो. पण तोंडांत्थीन आवाज भायेर न येंव देतां आमी दोघय चालत सलों. जुतेंचो आवाज येसे म्हणी तीं आधीच हातांत काढनी घेतलेलीं. आमी एतां सुपारी सुकत घायलेली त्यांहां पावत आयलेलों. जेमतेम तीन चार मिन्टांची वाट उरलेली. ओग्गी -हेवनी केंथीन कसले आवाज बी येसत काय आयकत सलों. सगळां वातावरण एकदम सुन्न सलां. दूर कारेतरी कुत्रे भोकलेलो अस्पष्ट आवाज येंत सलो.

## .. भूतस्य कथा रम्या

चान्नेचे उजेडांत रस्तेचे कडाचे झाडांच्यो चित्रविचित्र सावळ्यो हालत सल्यो. मनात फक्त भुताचेच विचार येंत सले. गंगेची ते दांतखीळच बेसलेली. तो माला चिकटोनीच चालत सलो. में तेला हळू आवाजांत खिसेंतले मंतरलेले तांदुळांचो हवालो देवनी "भ्येंव नाकां" म्हणी सांगत सलों. खरां म्हंजे सावळो एकटोच मळावर उरलेलो म्हणी मनाचो हिय्यो करनी आमला मळावर येवेचां पडलेलां. नाय जाले "पाड पडो त्या सुपा-याला, जगलों वाचलों जाले भीक मागोनी खांव येल" असो विचार करनी सकाळीं उजाडतकत आमी मळावर जानार सलों. "बाबडे सावळेची कितां अवस्था जाली से कोण जाणे! बरो तरी सले पुरे!" असां मनातले मनात यवजीत चालत सलों. नाकां नाकां म्हणताना सुद्धा सावळेविषयी अभद्र विचार मनात येंव लागलेले. तेचेच विचारांत में सलों, अणि तितकेंत.... मोठे झाडाची खांदी मोडले सारखो प्रचंड मोठो कसलो तरी आवाज आयलो अणि कोणतरी धडपडत रानात धांवत सले सारखो आवाज आयलो. इतको वेळ में खिसेंत सलेली बॅटरी पेटयली नतली. चान्नेचे उजेडांत आमी चालत सलों. पण एतां नाईलाज जालेलो. में आवाजाचे रोखान बॅटरी घायली अणि कसलो आवाज आयलो, कोण धांवलो तां बघेचो प्रयत्न केलो. मोठो धाडशीपणाचो आव हाडलो तरी माजे हात पांय कडकडत सले. गंगो आधीच माला चिकटोनी सलो, तो भ्येवनी झीट येवनी पडेचे बेतांत सलो. में एका हातान तेचे बचकुलाला घट धरलो अणि दुसरे हातान बॅटरी पेटयली. बॅट-याचे उजेडांत माला एक बरगो झालेलो काजीचो खांदो आडवो पडलेलो दिसलो. रानात धावत कोण गेलो तां मात्र दिसलां नाय. गंगेची खात्री झालेली की हें भुताचांच काम! तो कसोच पुढां येवे तयार हत नाय जालो. कितां कितां सांगोनी बघलां. शेवटी खिसेंतले मंत्रुनी हाडलेले तांदूळ तेला दाखयले, अणि हे तांदूळ आमचेकडा सत तो पर्यंत आमला कसलोच भय नाय म्हणी तेला सांगलां. कसोबसो एकदा तो तयार जालो.

एतांपर्यंतची धावाधांव अणि भय, हेचेमुळां आमी दोघय घामाघुम झालेलों. एतां कितां हयेल तां होंवदे, पण सावळेला घेतलेशिवाय जायवेचांच नाय म्हणी में मनातले मनात निश्चय केलो. एकदाचे आमी सावळेपर्यंत पावलों, तो तसोच घुसपटी मारनी निदवलेलो सलो. में हळू आवाजांत सावळेला साद घायलो. "सावळ्या, ए सावळ्या, ऊठ मरे. घरा जावया चल!" सावळेकडथीन कांयच प्रतिसाद आयलो नाय. में धीर एकवटनी हळू तेचे आंगावेल्ली चादर, चादर कसली, साधां कांबळीचां तरट, फटां सलां तां. "बहुतेक सावळो जरान फणफणलो से सनार. असो मनातले मनात विचार करीत तां फटां आंगावेल्ल्यां दूर करे सुरवात केली.

एतां सावळेला केंचे अवस्थांत बघेचो पडेल कोण जाणे. हेचां कितां बरांवाईट हयेल जाले तेचे घरचे माला जितो थेवेचे नाय. देवाचां नांव घेवनी में हळूहळू तेचे आंगावेल्लां फटां ओढे सुरवात केली. मध्यांच माजे कान अणि डोळे कणकींहारीं जांत सले. मघाशीं काजीचो खांदो पडलो त्यांहांथीन धांवलेलां तां भुतच सनार अणि एतां तां केंचेय क्षणाला आमचे मानगुटीवर येवनी बेसनार,असो भय दिसत सलो.

## .. भूतस्य कथा रम्या

साधी पानांची सळसळ झाली तरी आंगावर काटो येंत सलो. सावळेची तकली केंच्यावाटान से अणि पांय कें सत तांय कळत नतलां. एका वाटान हळू फटां उखलेचो प्रयत्न केलो जाले त्यावाटान उखलत नाय जालां. म्हणी दुस-या वाटान उखलूनी बघलां. तरीय तसांच! मोग मात्सो नेट लावनी उखललां जाले एक असोले नाल्लाएवढो गुंडो माजे पांयांवर पडलो. कळवळलोंच में एकदम. पण माजां नशीब बरां म्हणी पांयाला कांय झालां नाय. ही भूतचेष्टा का कितां कांयच कळत नाय झालां. इतकां सगळां हयसर सावळो कांयच जागमाग करीत नाय असां दिसतकत माजो धीर एकदम खचलो.

माला मोठ्ठ्यानी आड्डों कसां दिसों लागलां. शेवटी एकदाचो उरलो सुरलो धीर एकवटनी, एतां कितां हयेल तां हयेल असो विचार करनी, हयेल तितक्या शक्त्यान फटां ओढलां. दुस-यावाटान कुणीतरी ओढनी धरलेसारखां तां सहज ओढत नतलां. मोग एकच जोराचो हिसको देवनी फटां ओढलां, ते बरोबर चारय वाटान गुंडे घडघडले सारखो आवाज आयलो अणि फटां माजे हातांत आयलां. हिसकेबरोबर में पाठल्यां कोलमडलों. मोग तोल सावरीत सारखो उभो -हेलों अणि समोरचां दृश्य बघनी एकदम थिजोनी गेलों. माजे डोळेंवर माजो विश्वासच बेसत नाय झालो. में डोळे फाडफाडनी बघलां, सारखां दिसत नाय म्हणी खिसेंतली बॅट्री काढली. पेटवनी बघसां जाले फटेखालतो सावळो नाय. फटेखालतां एकटेला उखलों शकत नाय एवढां एक लाकूड त्यांहां सलां. ते लाकडाचे चारय वाटान फटां खालतां घालनी थेयलेलां. बघणारेला त्यांहां कोणतरी निदवलेलो सयवो असां दिसत सलां. वारेनबी फटां उडोनी जांव नये म्हणी तेचे कडान गुंडे थेयलेले सले. तेंतलोच एक माजे पांयांवर पडलेलो.

एतां मात्र इतको वेळ उसना हाडलेलां माजां अवसान लीप गळोनी गेलां. में दोनय हात तकल्यावर धरनी त्यांहांच बेसलों. गंगेच्या परिस्थितीचां ते वर्णन करे शब्दच नाय. माला रडे आवरत नतलां. मे रडत रडतच "सावळ्या, सावळ्या" म्हणी मोठ्यानी साद घाले सुरवात केली. गंगोय एतां आयले परिस्थितीला तोंड देवेच हवां हे विचारापर्यंत पावलेलो. तेणीय मोठमोठ्यानी सावळेला सादवे सुरवात केलीन. केंथीनच आमला कसलोच प्रतिसाद मिळलो नाय.

"हे भुताचां आमी कितां घोडां मारलेलां काय, म्हणी आमला ही शिक्षा देसे?" गंगो एतां भयाचे पुढां पावलेलो.

मोग आमी बॅटरी घेवनी मळाचे चारय वाटान सावळेला सोदलो. कडाकुशीला कारोय पडलेलो बी सयेल म्हणी बगलो. पण तेचो कांयच पत्तो लागलो नाय.

## .. भूतस्य कथा रम्या

"भुतां माणसाला झाडावरबी दडवनी थेयसत, दोन चार दिवसांनी मोग सोडनी देसत तेला. तसोच सावळेला थेयलोसे सनार. आमचे एका मावसेला तसोच दडवनी थेयलेलो. चार दिवस तो गायबच सलो. मोग आपणच आयलो एक दिवस घराशीं. येतकत कन्नडबी बोलत सलो. कर्नाटकीबी सलां सनार तां भूत!" सावळो त्या परिस्थितीला सुद्धा एतां हळूहळू सरावलेलो. मेलेलां कोंबडां आगीला भ्येंत नाय, तसो प्रकार!

इतकी सगळी तारातीर करीसर तांबडां फुटेची वेळ जालेली. एतां हात हालवीत परत जायवेचां, अणि सावळेचे आईबाबाच्यो गाळी खायवेच्यो इतकांच आमचे हातांत सलां.
तसेच आमी दोघय परत फिरलों. येताना रात्री काजीचो खांदो पडलेलो त्यांहां येवनी मात्से थांबलों. पडलेलो तो खांदो लीप बरगो जालेलो अणि तेला एका ब-या मोठ्या वेलीचां वेटोळां पडलेलां. ती वेल बहुतेक, तो कोण प्राणी रात्री धांवलो तेचे पायांत अडकली. अणि तेचो एकदम हिसको बेसलेबरोबर तो खांदो पडलो सयवो. रात्रीचे ते अचानक झालेले आवाजाची अशी संगती लागतकत मात्सां बरां दिसलां.

पण सावळेचो विचार एक क्षण सुद्धा तकल्यांतथीन जांत नतलो. चालतां चालतां वाटांतच गंगेन एक कल्पना सुचयलीन. "आमी असेच आधी त्या वेल्ले वाडेवेल्ल्या घाडीणीकडा जावया. आमी पावसां म्हणेसर उठलेली सनार ती. त्याला मात्सां घाडपण करनी बघ म्हणी सांगोया. कितां कळलां जाले कळलां त्याचेकडथीन! कोणाकोणाची गोरवां बी सांडलेलीं कें सत तीं बरोब्बर सांगसे खे ती!" मालायबी तेचां म्हणणा पटलां.

एतां बरां फटफटीत उजाडलेलां. अजुनी गांव मात्र जागो जालो नतलो. अणि घाडणीचां घर मात्सां दूरच गांवापाश्णी. संकटाचे वेळा दोतराकडा जायवे कोण वेळकाळ बघीत नाय. तसोच विचार करनी आमी घाडणीचां दार वाजयलां. दोन तीन वेळा वाजयतक "कोण रे?" असो दादलेचे करारी आवाजांत प्रश्न आयलो.

"आमीच ते!"
"आमी म्हंजे कोण?"
"अरे दार तरी उघड, मोग सांगसां सगळां."

"आपलां नांव सांगे लाज दिससे, कोण आयलो से तां कसां कळनार, कसले एकेक लोक येसत सकाळीं सकाळीं" असां आपलेशीच पुटपुटत, पण आमला आयके येल असां  घाड्यान दार उघडलान.

## .. भूतस्य कथा रम्या

दार उघडलेबरोबर विड्याचो धुकट अणि वास एकदमच नाकांत रिघलो. दार उघडेचे पयलीं आवाजावेल्ल्यां माला तो घाडणीचो घो सयेल असां दिसलेलां, पण दार उघडलेबरोबर बघसां जाले तोंडात विड्याचो भलोमोठो झुठो सलेली घाडीणच आमचे पुढेंत उभी सली. कपाळभरीं भरलेलो मळवट, तितकांच भडक कुंकू, बगलेबरोबर किळस येव्वी असे वर्षानुवर्षां तेलाचो स्पर्श न जालेले जटा युक्त केंस, काळी लीपस्टीक लायलेसारखे काळे, जाड जाड ओंठ, तारवटलेले डोळे, असो तो अवतार बगनी खरां भूत सुद्धा पुढेंत येवनी -हेलेलां जाले चालनार सलां असो विचार माजे मनात येवनी गेलो.

"सांग सांग रोकडां कितां तां! किताला आयलेसा सकाळींपुढां? घाडणीन आपले भरदार आवाजांत आमला दरडायले सारखां विचारलान. मोग में त्याला कालपाश्णी कितां कितां जालां तां सगळां सांगलां!

"तू लोकांची गोरवांबी सांडलीं जाले कें सत तीं अचूक सांगसय असां माला गंगेन सांगलान. तसांच एतां सावळो कें सनार तो आमला सांग. तेला सोदनी काडलो नाय जाले तेचे आईबाबा आमला काबार करनार सत.“

घाडणीन आमला सगळां आईकतकत घरांत घेतलेन. घरांत जावनी त्याणी एका पारेवर थेयलेली विडी काढलीन अणि पेटयलीन. दोन पांच झुरके माल्लेन अणि भितल्ल्या खोल्यांत गेली. आमी बेसलेंलों ती खोली दो-यावर लोंबणारे कळकट कपडेनी अणि बाकीचे सामानान भरोनी गेलेली. कुबट वास सगळेकडा भरोनी -हेलेलो.

थोडेवेळान घाडीण नाचत नाचतच भाएर आयली. तोंडान हूं हूं हूं असे आवाज काढनी मध्यां मध्यां कितांतरी बडबडत सली. आमी दोघय एकामेकाचे तोंडाकडा बघीत -हेलेलों. दोघानाय ती बोलसे तेंतलां कांय्येक कळत नतलां. थोडेवेळान ती मात्शी शांत जाली अणि घुमत घुमत जमनीवर बेसली. मोग एक लिंबू काढनी माजे हातांत दिलोन अणि सांगलान, "घराभाएर चल, खळेंत मध्यां -हे, ह्या दिशाला तोंड कर अणि घट्ट डोळे मिटनी लिंबू उंच आकाशांत उडय. जमनीवर लिंबू पडतकत डोळे उघड अणि लिंबू ज्या दिशाला पडलो सयेल त्या दिशाला दोन किलोमीटर चल. त्यांहांच तुमला सावळो मिळणार. में पडते फळाची आज्ञा म्हणी रोकडो जायवे सुटलों, ते बरोबर घाडणीन माला बलायलोन अणि देवीचे ताटांत कितां तरी घाल म्हणी सांगलान. में मुकाटेन खिसेंत एकच नोट सली ती ताटांत उडयली अणि सटकलों.

लिंबू पडलेलो ती दिशा नेमकी मळावर जायवेचीच. म्हणी मे परत मळावेल्ले वाटाला लागलों. दहा वीस पावलां चालल्लों सयेन गंगेन माला थांबयलोन. "तू पिसावलो सय? परत एतां कें मळावर जासय? आमी मळावर सगळेकडा फिरोनी बघलांसे. वाटांतय आमी बघीत बघीत आयलोंसां. तो मळाहारीं नसनारच." गंगेन माला पेचांत उडयलोन.

## .. भूतस्य कथा रम्या

"अरे पण त्या घाडणीन सांगलान मरे!"

में येत नाय. " तू जानार सय जाले चल एकटोच, में आदी पोटाला कितांतरी घायलेशिवाय कसोच येवेचों नाय. भूकानच माजो जीव एतां जायवे पावलोसे." - गंगो

मालायबी खूप भूक लागलेली. माला गंगेचां म्हणणां पटलां. आमी चालेची दिशा बदलली अणि सरळ सांवताचे हॉटेलाची वाट धरली. खिसेंत एतां दमडी नतली, पण सावंताला उद्या पैसे देसां म्हणी सांगलां जाले तो आईकनार!

आमी ओग्गी -हेवनी वाट तुडवीत सलों. सांवताचे हाॅटेलांतलो मिर्च्यो अणि भजेंचो वास एतां आमचे नाकापर्यंत पावों लागलेलो. हळूहळू अस्पष्ट अशो गिरायकांच्यो गजाली, प्लेटींचे, ग्लासाचे, कपबशांचे असे वेगवेगळे आवाजय आयके येंव लागले. तितकेंत मोठ्यानी कोणतरी हंसलेचो आवाज आयलो. आमी मात्से त्यांहांच थबकलों.

"रात्रभरीं बरोच उद्योग केलोत ते तुमी, नाय उपाय तुमचेपुढां!"
असांच कितां तरी सांवतान म्हटलेलां आयके आयलां. अणि परत दोघातीघांचो हसणेचो आवाज.
सावंताचो आवाज आमी ओळखलो, पण बाकीचे कोण ते कळले नाय.
आमला पोटांत एकदा कितांतरी रोकडां धकले मिळले पुरे, असां जालेलां.

आमी सांवताचे हॉटेलांत रिघलों, आमला बगलेबरोबर किताला कोण जाणे, पण हसणेचो आवाज अचानक थांबलो. में समोरचे टेबलावर नजर मारली अणि तीन ताड उसळलोंच एकदम. रात्रभरींचे जागरणाला लागोनी माला झापड बी येवनी भलतांच कितां दिससे काय असां दिसों लागलां. डोळे चोळनी जागो सलेची खात्री केली. काल रात्रीपाश्णी गंगो अणि में जेचेकरतां तळमळलों तो सावळो समोरचे टेबलावर मोनेनी बेसलेलो सलो! शून्यात डोळे लावनी बेसलेले सावळेला बघनी हेचे तकल्यावर कितां तरी परिणाम झालोसे कसां दिसत सलां. आमी तेचे पुढेंत गेलों जाले तेणी कांयच हालचालय केलींन नाय अणि में तेला साद घायलो तेला प्रतिसादय दिलोन नाय.

गंगो समोरचेच खुर्च्यावर बेसोनी सावळेचे निरिक्षणात दंग जालेलो. में पावभाजी ऑर्डर केली. वेटरान पुढेंत हाडनी हापटलीन, आमी दोघांनीय ती खाल्ली, अणि "पैसे मोग देसां हां" म्हणी सांवताला सांगोनी भाएर सल्लों.

भाएर आयले बरोबर गंगेन एकदम खायले आवाजांत बोले सुरवात केलीन. "माला एतां सगळां कितां तां पाठले दहा मिन्टांत कळलां. में भीतर बेसोनी तोच विचार करीत सलों. त्या घाडणीचे लिंबाचे विश्वासावर आमी -हेलेलों जाले फोणात पडनार सलों. भुकावलेले आमी तोंड वरतां करनी दुपारपर्यंत मळावर फिरत -हेनार सलो. अणि हाताला कितां लागनार सलां? फातरे?"

## .. भूतस्य कथा रम्या

"एतां में सांगसां तां आईक. आमी एतां सरळ पोलीस स्टेशनात जावनी पाटील सायबाला मिळोया. में तेला सगळां सांगसां!" काल रात्रीपाश्शी सतत माजेबरोबर -हेलेले अणि मध्यांच कच खाणारे गंगेचां वेगळांच रूप माला दिसत सलां. में केडला तेचे पाठल्यां जांव लागलों तां मालाच कळलां नाय. खरां म्हंजे गंगो कितां सांगसे तां माला कळतय नतलां अणि कळत सलां तरी पटत नतलां. तरीयबी आमी पाटील सायबाकडा गेलों. पाटील सायबाचो दरारो जबरदस्त! गुन्हेगार तेला बघतकतच कांपत सले!
गंगेची बहुतेक सायबाकडा मात्शी ओळख सयवी. तो सायबाचे कॅबिनात गेलो अणि तेला कितांतरी सांगलान. में आपलो भाएरच बेसोनी -हेलों.

साधारण अर्धे तासान गंगो अणि सायब दोघय भाएर आयले. "चल जावया" म्हणी गंगेन माला खूण केलीन. सायबाचे जीपींत बेसोनी वाटाला लागलों. सांवताचे हॉटेलाकडा येवनी सायब एकटोच उतरलो अणि हॉटेलांत गेलो. दोनच मिन्टांत परत आयलो. जीप स्टार्ट केलीन ती तडक सावळेचे दारांत उभी केलीन. झट्करनी उतरलो तो सावळेचे घरांत गेलो. मिन्टाभीतर सावळेचे गॉलाला धरनी भाएर आयलो. "सगळां खरां कितां तां सांग!" पाटील सायबान गर्जना केलीन. माजराचे मानाकडा धरतकत माजर अजिबात धडपड करे पावत नाय तशी अवस्था सायबान मानगुटीला धरतकत सावळेची झालेली.

सावळो सांगों लागलो.

" काल रात्री रोस खावनी आमी निदवलों. गंगेन सगळां आवरलान, आयदणानी पाणी घालनी थेयलान.अणि मोग तो निदवे आयलो. में तेचे आदीच निदवलेलों. माला नीज लागली नतली, पण में तां गंगेला कळे दिलां नाय. गंगेन माला दोन चार वेळा साद घालनी बघलोन अणि तो निदवलो. में मोग हळूच उठलों अणि कणकीनी दडोनी -हेलेले शिवाला बॅट-यान खूण केली. ते बरोबर तेणी त्यांहां कणकी हालवनी मोठ्यानी आवाज करे सुरवात केलीन. मे गंगेला उठयलो अणि तेला सांगलां "भुतां कणकी हालयसत तीं बघ!" गंगो भ्यालो. में मालाय भय दिससे म्हणी सांगलां. गंगेन माला पोळोनी जावया म्हणी सांगलान, पण में तेला सांगलां की माजेंत चालेचां अजिबात त्राण नाय. माला जर आयलोसे, मे एठाच घुसपटी करनी -हेसां. गंगो एकटोच गेलो, गांवांत्थीन कोणालाय बलावनी हाडसां म्हणी सांगलान. तो जायवे धांवतच सुटलो. में निदवलेलो उठोनी तेचे पाठल्यां तेचेवर शेकराडे माल्ले, ते बरोबर तो अणि नेटान धांवत, नायसोच जालो. में मोग शिवाला बलायलो. आमी दोघांनीय वीस पंचवीस पिशव्यो सुपा-यो भरल्यो अणि रानात न्हेवनी दडवनी थेयल्यो. मोग में निदवलेलों त्यांहां एक मोठांसा लाकूड हाडनी थेयलां, अणि तेचेवर कांबळ घालनी थेयली. ती वारेन बी जांव नये म्हणी कडान गुंडे लावनी थेयले. अणि आमी दोघय घरा जायवे सुटलों. मात्से पुढां पावलों जाले समोरथीन कोणतरी येसे असां दिसलां. म्हणी त्यांहांच रस्तेचे कडाला काळोखांतच धांवलो. शिवाचे पांयाला कसली तरी वेल का कितां तरी अडकली अणि वेलीला अडकलेलां कसलां तरी लाकूड पडलेलो आवाज आयलो. आमी तसेच पुढां धावलों अणि थोडेवेळान परत वाटान गावांत आयलों.

.. भूतस्य कथा रम्या

माला भुतानच नायसो केलो सनार असां समजोनी गंगो घाडीणीकडा जानार हेची माला खात्री सली. म्हणी में अणि शिवान रात्रीच घाडणीकडा जावनी त्याला गंगेची दिशाभूल करे दोनशें रुपये दिले. मे सांगसां तसां ती करनार हेची माला खात्री सली. कारण गोरवां कें सत तां अचूक सांगणेपाठलां गुपित माला खबर से. ती आपले घोवालाच ते गोरवाना दडवनी थेय म्हणी सांगसे. तेमुळां गोरवां कें सत तां त्याला आधीच खबर ससे.

इतकेंत काय गंगो गांवांत पावेचो नाय, अणि आयलो तरी सांवताचे हॉटेलाकडा येल असां दिसलां नतलां. आमी मळेंत थेयलेल्यो सुपा-यो सांवताच्याच गाड्यांत घालनी हाडनी तेलाच विकनार सलों. म्हणी तेला सगळां सांगेचां पडलां. तो गंगेची झालेली घाबरगुंडी आयकोनी हंसत सलो, तितकेंत हे दोघय त्याहां पावले. हेना बघलेबरोबर में भुतामुळां माजे तकल्यावर परिणाम जालेचां नाटक केलां.“

इतकां सगळां आमचे पुढेंत वदवनी घेतलेबरोबर सायबान शिवाला जिपींत कोंबलोन, अणि धुल्लो उडवीत जीप नायशी झाली.

माधव जोशी – गोवा

● ● ●

## चित्पावनी च्या संवर्धनासाठी गणपुले फाऊंडेशन चे उपक्रम

- चित्पावनी भाषेची तोंड ओळख – ऑनलाईन कार्यशाळा
- मासिक ऑनलाईन मीट
- चित्पावनी पाठयक्रम
- चित्पावनी त्रैमासिक
- चित्पावनी दिवाळी अंक २०२४
- www.chitpavani.org या संकेतस्थळाची सुरुवात

# ससो अणि कासव



एका रानात एक कासव आणि ससो ऱ्हेत सले. ते दोघय बरोबर भोवत सले खेळत सले. एकदा दोघांनी शर्यत लावेची ठरयली.. ससेला कितां दिसला में लौकर चालणार अणि कासवाला हरयणार.

ठरला.. !

दोघय टेकड्यांवर गेले अणि चालों लागले. मग कितां जाला. चालता चालता वाटात त्याला एक शेत दिसला . त्याहा बरी गाजरा, मुळे, बरा हिरवागार गवत सला. हें बगले बरोबर ससेचे तोंडाला पाणी सुटला अणि तेणी गवत, गाजर, मुळे वर ताव मारले बरोबर तेला निज आयली.

मग कितां एका झाडाचे सावळ्यांत (सावलीत) निदवलो अणि कासव बाबडो चालत चालत टेकड्यांवर पावलो इतकेत ससेला जाग आयली  तसो तो खाडकन जागो जालो. एतां माला लोक्कर जायवे हवां नायतर कासव शर्यत जिकनांर. मग तो लौकर लौकर चालो लागलो. पण कितां काय म्हटलेवर कासव त्याहा पावलों सुद्धा.

तात्पर्य  कितां दुसरेला कईच कमी (तुच्छ) लेखू नाका. किंवा गर्व केड्ला करु नाकां.

श्रीमती अश्विनी फाटक
सालेली, सत्तरी, गोवा.

गणपुले फाऊंडेशन
फोन: +९१ ९९२० ३४५ ८६१
ईमेल: info@ganpulefoundation.org

चित्पावनी भाषेची तोंड ओळख ही कार्यशाळा तुम्ही केली नसल्यास, खाली दिलेल्या लिंक वर क्लिक करून गणपुले फाऊंडेशन च्या फेसबूक पेज ला फॉलो करा म्हणजे पुढील कार्यशाळेबद्दल माहिती तुम्हाला मिळेल.

